अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

- रविवार दि.१ जानेवारी २०२३
- वर्ष : २१ वे ▸ अंक : ९६ वा
- किंमत : ५ रुपये ▸ पाने ८
- www.surajyadigital.com




# प्रेमाने प्रेमासाठी प्रेमालाच संपवले

## प्रेमाचा तिरस्कार : प्रियकर वडिलांच्या खुनात प्रेयसीच्या भावासह अडकला

✔ सुराज्य/सोलापूर

**वडील म्हणजे साक्षात जन्मदाता. साहजिकच त्याचे पोटच्या मुलावर प्रेम. त्याच मुलाने केले एका मुलीवर प्रेम. ती मुलगी म्हणजे वडिलांच्या 'प्रेमाचे प्रेम'. म्हणून वडिलांनी केला मुलाच्या प्रेमाचा तिरस्कार. त्या मुलीलाही होता तिच्या आईच्या प्रेमाचा तिरस्कार. याच तिरस्कारातून तयार झाला प्रेमाचा अनोखा त्रिकोण. त्यातून मुलाने प्रेयसीच्या मदतीने प्रेयसीच्या भावासह केला स्वत:च्याच वडिलांचा खून. त्यातून संपले प्रियकराच्या वडिलांचे अन् प्रेयसीच्या आईचे प्रेम. पण प्रेमापोटीच बहिणीसोबत आलेला भाऊ आणि बहिणीचा प्रियकर असे तिघेही गेले गजाआड.**



या गुंतागुंतीच्या प्रेमप्रकरणातून जन्मदात्या वडिलांचा खून केल्याची घटना घडली आहे पंढरपूरजवळील कासेगाव परिसरात. याप्रकरणी पंढरपूर तालुका पोलिसांनी प्रियकर-प्रेयसी आणि तिच्या भावाला बेड्या ठोकल्या आहेत. सोहेल अफजल बागवान (रा. दाळेगल्ली पंढरपूर) या प्रियकरासह त्याची अल्पवयीन प्रेयसी आणि तिचा अल्पवयीन भाऊ अशा तिघांना अटक करण्यात आली आहे. या तिघांनी मिळून सोहेलचे वडील अफजल बागवान याचा खून केला आहे.

### काय घडले?

कासेगाव (ता.पंढरपूर) येथील खडी क्रशरजवळ असणाऱ्या कालव्याच्या बाजूस दगडाने डोके व चेहरा ठेचलेला तसेच अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. या ठिकाणी ग्रामस्थांनी दोन अल्पवयीन मुलांना थांबवून ठेवले होते. या दोन मुलांनी अफजल बागवान याच्या डोळ्यात चटणी टाकून, पाय बांधून दगडाने ठेचून आणि अंगावर पेट्रोल टाकून पेटवून खून केला, अशी प्राथमिक माहिती गावकऱ्यांना मिळाली होती.

### ▸ प्रेयसी व तिच्या भावाची हकिकत

अल्पवयीन प्रेयसी व तिचा भाऊ आईवडिलांसह पंढरपूरमध्ये राहत असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर घराजवळच राहणाऱ्या अफजल बागवान याचे या मुलांच्या आईसोबत प्रेमसंबंध जुळले. त्यातून या दोघांना तो त्रास देत होता. त्या रागातून या दोघांनी शनिवारी लातूरहून पंढरपूरमध्ये येऊन अफजल बागवान यांना मामाच्या घरी जायचे आहे असे सांगून रिक्षातून घटनास्थळी आणले. त्याठिकाणी अफजल यांच्या डोळ्यात चटणीची पूड टाकून त्यांच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवून दिले. तो पळून जाऊ लागताच त्याचे पाय बांधले. त्यानंतर डोक्यावर दगड मारून खून केला, अशी हकिकत अल्पवयीन प्रेयसी आणि तिच्या अल्पवयीन भावाने पोलिसांनी दिली.

### ▸ पोलिसांनी शोधले खरे कारण

याप्रकरणाचा पोलिसांना संशय आला. म्हणून त्यांनी दोघांना विश्वासात घेतले. तेव्हा वेगळीच माहिती पुढे आली. अल्पवयीन मुलगी मयत अफजल बागवान याचा मुलगा सोहेल यांचे प्रेमसंबंध होते. ते दोघे लग्न करू इच्छित होते. त्यास अफजलचा विरोध होता. म्हणून या तिघांनी मिळून अफजलचा खून करण्याचे ठरवले. त्यासाठी लातूरहून आलेल्या या दोघांनी सोहेलची भेट घेऊन अफजल यास निर्जनस्थळी आणण्याचे ठरवले. त्याठिकाणी त्यांच्यापूर्वीच पोहचलेल्या सोहेलने वडिलांच्या डोळ्यात चटणी टाकून त्यांच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवून दिले.

## नागपुरातील स्वयंसेवक संघ मुख्यालय बॉम्बने उडवण्याची धमकी

✔ नागपूर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात बॉम्बस्फोट घडवण्याच्या धमकीचा दूरध्वनी एका अज्ञात व्यक्तीने पोलीस नियंत्रण कक्षाला केला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. पोलीस आयुक्तांसह सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संघ मुख्यालयाची सुरक्षा व्यवस्था वाढवली. धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी सकाळी ११ च्या सुमारास पोलीस नियंत्रण कक्षाला निनावी दूरध्वनी आला.



दूरध्वनी करणाऱ्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयात बॉम्बस्फोट घडविणार असल्याची धमकी दिली. नियंत्रण कक्षाने लगेच पोलीस आयुक्तांसह सर्वच वरिष्ठांना माहिती दिली. क्युआरटी कमांडोसह पोलिसांच्या तुकड्या संघ मुख्यालयात पाठविण्यात आल्या. पोलीस उपायुक्त गोरख भामरे यांनी लगेच संघ मुख्यालय गाठले आणि सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. संघ मुख्यालयाला उडविण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध पोलीस घेत आहेत. सायबर क्राईमच्या माध्यमातून निनावी फोन करणाऱ्याचे शोध घेणे सुरू आहे. गेल्या महिन्यातच सचिन कुलकर्णी नावाच्या इसमाने संघ मुख्यालय उडविण्याची धमकी दिली होती. त्याला सक्करदरा पोलिसांनी अटक केली होती. यावेळीसुध्दा पोलिसांना अशाच प्रकारचा संशय आहे. त्यामुळे सरत्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी पोलीस विभागात खळबळ उडविण्यासाठीच कुणीतरी धमकी दिल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## माझ्याच पक्षातील नेत्यांचा माझ्याविरोधात कट
### अब्दुल सत्तारांचा गंभीर आरोप

✔ सुराज्य/नागपूर

नागपूर अधिवेशनात टीईटी आणि गायरान भूखंड घोटाळ्याप्रकरणी विरोधकांनी अब्दुल सत्तारांच्या राजीनाम्याची मागणी केली. मात्र, याप्रकरणी आता अब्दुल सत्तार यांनी स्वत:च्याच पक्षातील म्हणजेच बाळासाहेबांची शिवसेना पक्षातील नेत्यावर आरोप केले आहेत. नाव न घेता संबंधित नेत्यावर अब्दुल सत्तार यांनी आरोप केले आहेत.

यावेळी त्यांनी माझ्याच पक्षातील नेत्याने माझ्याविरोधात कट रचल्याचे त्यांनी म्हटले. त्यामुळे सध्या राज्याच्या राजकारणात अब्दुल सत्तार यांच्या या वक्तव्याची चर्चा रंगली आहे. मला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. यात काही माझ्या पक्षातील असू शकतात तर काही माझे हितचिंतक आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरात होणारी चर्चा बाहेर येत आहे. त्यामुळे आमच्यातील कोणेतरी बाहेर बातम्या पुरवत असल्याचा आरोप सत्तार यांनी केला आहे. तर ज्यांना मंत्रिपद मिळाले नाही त्यांच्याकडून हे सर्व सुरु आहे असा गौप्यस्पोट अब्दुल सत्तार यांनी केला. अब्दुल सत्तार यांच्या या विधानाने राजकिय गोटात खळबळ उडाली आहे. त्यामुळे शिंदे गटात अंतर्गत कुरघोडी सुरु असल्याची चर्चा आता रंगताना पाहायला मिळत आहे.

## पत्नीसोबत जाताना पतीला मोटारीतून पळवले; चौघांना अटक

खेडभाळवणी येथील घटना

✔ सुराज्य/सोलापूर

**पत्नीसोबत दुचाकी वरून जात असताना मोटारीतून आलेल्या चौघा इसमानी पत्नीला सोडून त्यांच्या पतीला बळजबरीने मोटारीतून पळवून नेले. ही घटना पंढरपूर तालुक्यातील खेडभाळवणी येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी चौघा अपहरणकर्त्यांना वाहनासह सोलापुरात रात्री पकडून गुन्हा दाखल केला.**

सोमनाथ पाटील (वय ५३ रा.चौफळा वस्ती, कौठाळी ता.पंढरपूर) असे अपहरण झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांची पत्नी अलका पाटील या बारामती येथून एसटीने भंडीशेगाव येथील बाजीराव विहीर स्टॉप येथे शुक्रवारी सकाळी उतरल्या होत्या. त्यांना दुचाकीच्या पाठीमागे बसवून सोमनाथ पाटील हे कौठाळी येथे घराकडे निघाले होते.दुपारी १२ च्या सुमारास दोघे खेडभाळवणी येथे आले होते. त्यावेळी पाठीमागून स्कार्पियो मोटारीतून आलेल्या चौघांनी त्यांना वाटत अडविले. आणि पाटील तुम्ही गाडीत बसा, असे म्हणत त्यांना बळजबरीने मोटारीत बसवून घेतले. आणि मोटर मोहोळच्या दिशेने निघून गेली पतीचे अपहरण झाल्यानंतर अलका पाटील यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला.पोलीस निरीक्षक धनंजय जाधव आणि त्यांच्या पथकाने मोबाईलचा लोकेशन वरून आरोपीचा शोध घेतला. तेंव्हा आरोपी सोलापुरात असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे शुक्रवारी रात्री अपहरण कर्त्यांना सोलापुरातील एसटी स्टँड परिसरात वाहनासह ताब्यात घेतले.पुढील तपास हवालदार ढोबळे करीत आहेत.

### पैशाच्या व्यवहारातून घडला प्रकार

अपहरणकर्ते हे टिप्पर आणि वाहनाचा व्यवसाय करतात. एका टिप्परच्या व्यवहारात सोमनाथ पाटील हे मध्यस्थी होते. पैशाच्या वादातून त्यांनी पाटील यांचे अपहरण केले. असे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले, असे पंढरपूर ग्रामीणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी सांगितले.



# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संवर्धनाचा ७३ कोटींची आराखडा अंतिम टप्प्यात

## आषाढीपूर्वी आराखडा पूर्ण करण्याचा प्रयत्न

✔ सुराज्य/पंढरपूर

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्यासाठी ७३ कोटींचा आराखडा बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. राज्य शासनाच्या सूचनेनुसार आषाढीपर्यंत सदर काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिली.

मंदिर समितीची बैठक नवीन भक्त निवास येथे पार पडली. यास मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शिवाजी महाराज मोरे, भास्करगिरी महाराज, ॲड. माधवी निगडे, डॉ.दिनेश कदम, संभाजी शिंदे, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड उपस्थित होते. तर सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर व सदर आराखडा बनविणाऱ्या आफळे असोसिएटच्या तेजस्विनी आफळे हे दोघे ऑनलाईन हजर होते.

बैठकीनंतर बोलताना ठोंबरे यांनी सांगितले की श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व समितीच्या अंतर्गत येणाऱ्या २८ परिवार देवतांची मंदिरे यांच्या जतन व संवर्धनासाठी राज्य शासनाने ७३ कोटी रूपये मंजूर केले आहेत. यामध्ये मुख्यतः मंदिराचे अनेक वर्षे जतन व्हावे, संवर्धन करणे, मूळ स्वरूपात रचना करणे आदींचा समावेश आहे. त्यानुसार मंदिर समितीने एक आराखडा सादर केला होता. सदर आराखड्याचे मागील महिन्यात मुख्य सचिवांच्या समिती समोर सादरीकरण करण्यात आले. यावेळी त्यांनी काही सूचना केल्या तसेच आज मंदिर समितीच्या बैठकीमध्ये देखील सदस्यांनी काही सूचना मांडल्या. या दोन्ही सूचनांचा एकत्रित आराखडा तयार करून यास मान्यता घेण्यात येणार आहे. दरम्यान श्री विठ्ठल व रूक्मिणी हे राज्याचे आराध्य दैवत असल्याने येथील कामाचे भूमिपूजन करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आमंत्रित केले जाणार आहे. राज्य शासनाच्या सूचने नुसार आषाढी पर्यंत सदर काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे देखील ठोंबरे यांनी सांगितले.

आराखड्यानुसार मंदिरात करण्यात येणार बदल- राज्य शासनाच्या सूचने नुसार श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर मूळ स्वरूपात भाविकांना दिसणे आवश्यक आहे. मंदिराचे जतन करताना पुढील शेकडो वर्षे यास धक्का लागणार नाही त्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत. दरम्यान मंदिर समितीची रविवारी पाच तास बैठक सुरू होती. यामध्ये विविध विषयांवर सखोल चर्चा झाली. मंदिराचा आराखडा पडद्यावर सादर करण्यात आला. सदस्यांनी यामध्ये काही सूचना देखील केल्या तसेच बैठकीमध्ये मंदिराचे अस्थापन या विषयावर जोरदार चर्चा झाली.

### आराखड्यातील कामे अशी

**काळा व तांबडा दगड वापरून आकर्षक पद्धतीने काम केले जाणार आहे. पदस्पर्श दर्शन रांगेतील भाविकांना मूळ मंदिर पहावयास मिळत नाही. यासाठी सभा मंडपातील डावीकडील कार्यालये काढून येथूनच दर्शन रांग सुरू करण्यात येणार आहे. देवाच्या गाभाऱ्यातील मार्बल काढून टाकले जाणार आहे. मंदिरातील जुन्या विजेच्या वायरी काढणे, पावसाळ्यात पाणी गळणे यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार आहे. फरशी काढून या ठिकाणी दगडाची फरशी व आवश्यक तेथे दगड व लाकडाचे काम केले जाणार आहे. भाविकांसाठी आवश्यक ठिकाणी छत उभारले जाणार आहे.**



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नवे वर्ष, नवी आशा
नवी वाट, नवी दिशा!

कल्याण
169-61-137

# उपसरपंचाची निवड ६ जानेवारी रोजी होणार; जिल्हाधिकाऱ्यांकडून तहसीलदारांना आदेश पारित

**सुराज्य/चिखली**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मोहोळ तालुक्यातील कामती बु, यावली, वाफळे, कुरणवाडी ( आष्टी), मोरवंची, अर्धनारी, अरबळी, बैरागवाडी, डिकसळ, सारोळे या मुदत संपलेल्या १० ग्रामपंचायतींसाठीचा कार्यक्रम जाहीर झाला होता.

निवडणुकीचा निकाल २० डिसेंबर रोजी जाहीर होऊन ग्रामपंचायतीमध्ये नवे लोकप्रतिनिधी (सरपंच) विराजमान झाले आहेत. आता उपसरपंचाची निवड शुक्रवार ६ जानेवारी २०२३ रोजी उपसरपंच पदाची निवडणूक होणार आहे. या सर्व ग्रामपंचायतींमध्ये लोकनियुक्त सदस्य आणि सरपंच विराजमान झाल्यानंतर आता नूतन सरपंचाच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच पदाची निवडणूक घेण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना पारित केले आहेत . त्यानुसार मोहोळ तालुक्यातील १० ग्रामपंचायतीच्या नूतन सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार ६ जानेवारी रोजी उपसरपंच पदाची निवडणूक होणार असून या उपसरपंच पदाच्या निवडणुकीच्या सभेसाठीची नोटीस प्रत्येक सदस्याला तीन दिवस आगोदरच पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उपसरपंच पदाच्या निवडणूकीची प्रक्रिया प्रशासकीय दृष्ट्या सुरळीतपणे पार पाडण्यासाठी गट ब च्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आली असल्याची माहिती तहसील प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

सरपंच आणि सदस्य थेट जनतेतून निवडून आले आहेत मात्र उपसरपंच नवनियुक्त सदस्यांना निवडून द्यावा लागणार आहे.या प्रक्रियेमुळे राजकीय हालचाली गतीमान झाल्या आहेत. सरपंचपदाची संधी हुकल्याने आपल्याच पॅनलच्या सदस्याची उपसंरचपदी वर्णी लागावी यासाठी रस्सीखेच होणार असल्याने अनेकांचे राजकीय वर्चस्व पणाला लागणार आहे. निवडणुकीतील तडजोडीनुसार अनेक ठिकाणी उपसरपंच देखील बिनविरोध करण्यासाठीची रणनिती आखण्यात आल्याचे चित्र दिसून येत आहे.

# किल्लारी अन् बिहारी मजुरांच्या जोरावर फुलले द्राक्षमळे

## मजूर टंचाईवर शेतकऱ्यांची मात; जिल्ह्यात पाच हजारांवर मजूर

**सुराज्य/सोलापूर**

स्थानिक पातळीवरील मजूर टंचाई आणि वाढलेल्या मजुरीवर उपाय म्हणून सोलापूर जिल्ह्यातील द्राक्षबागायतदारांनी किल्लारी व बिहारमधील मजूर आणून, त्यांना द्राक्षबागेत काम करण्याचे प्रशिक्षणही दिले आहे. योग्य मजुरी, दिवसभर काम करण्याच्या क्षमतेमुळे पंढरपूरसह जिल्ह्याच्या अनेक तालुक्यातील भागात द्राक्ष मळे बिहारी आणि किल्लारी येथील मजुरांच्या जोरावर बहरत आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शि,माळशिरस, माढा भागात द्राक्षबागांचे क्षेत्र मोठे आहे. या भागात द्राक्ष हंगाम साधारण एकाच वेळी सुरू होतो. परिणामी हंगामात मोठी मजूर टंचाई निर्माण होते. या मजूर टंचाईवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी बिहार येथून मजूर आणले. त्यानंतर अन्य तालुक्यातील गावांत बिहारी मजूर येऊ लागले. आता सोलापूर जिल्ह्यातील द्राक्ष मळ्यात काम करणाऱ्या बिहारी आणि किल्लारी येथील मजुरांची संख्या पाच हजारांवर गेली आहे. या मजुरांना द्राक्षांच्या बागेत काम करण्यासाठी प्रशिक्षण



दिले जाते. द्राक्ष बागायतदार सांगतील त्या पद्धतीने ते काम करतात. द्राक्ष हंगामात पुरुष मजूर सकाळी आठ ते दुपारी दोन या सहा तासांसाठी ४००, तर महिला ३०० रुपये घेतात. बिहारी मजूर स्थानिक मजुरांच्या तुलनेत थोडी कमी मजूरी घेतात. त्यामुळे ऐन हंगामात कामाचा उरका होतो. काही शेतकऱ्यांनी बिहारी मजुरांची टोळीच आणून ठेवली आहे. मजुरांना राहण्याची सोय करून दिली जाते. शेतकरी या बिहारी मजुरांना एक एकर (४० आर) बागेतील कामे करण्यास साधारण ३५ हजार रुपये देतात. हीच कामे स्थानिक मजुरांकडून करून घेतली तर ४५ हजार रुपयांवर जातात. बिहारी मजुरांकडून काम करून घेणे शेतकऱ्यांनी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. ऐन हंगामात मोठी मजूर टंचाई निर्माण होते. बागेतील कामे वेळेवर होत नाहीत. वातावरणात बिघाड झाल्यास मोठे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकरी बिहारी मजुरांकडून काम करून घेण्यास प्राधान्य देतात. जिल्ह्यात द्राक्षबागेत काम करणाऱ्या मजुरांची संख्या दहा हजारांच्या पुढेच आहे.

बिहारी किंवा किल्लारी येथील मजुरांकडून काम करून घेणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. ते मजूर आले नाहीत, तर आपल्या भागात मजूर मिळत नाही किंवा मजुरीचे दर परवडत नाहीत म्हणून द्राक्षबागा काढून टाकाव्या लागल्या असत्या. बिहारी मजुरांवरच आमच्या बागा अवलंबून आहेत. असे अनेक द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना सांगितले.

## मेडशिंगीच्या सरपंचपदी उमा इंगवले तर उपसरपंचपदी अमर गोडसे

**सांगोला** : मेडशिंगी ग्रामपंचायतच्या सरपंच पदी आबा बापू गटाच्या उमा प्रतापसिंह इंगवले यांची तर उपसरपंच पदी अमर गोडसे यांची बिनविरोध निवड झाली आहे. निवडीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष मा. आम. दिपकआबा साळुंखे- पाटील यांच्या हस्ते नूतन सरपंच व उपसरपंच यांचा सत्कार करण्यात आला. तत्कालीन सरपंच यांनी ठरल्याप्रमाणे मुदतीत राजीनामा दिल्याने रिक्त असलेल्या मेडशिंगी ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच पदासाठी ३० डिसेंबर रोजी झालेल्या निवडीमध्ये सदरची बिनविरोध निवडी पार पडल्या. या निवडीमध्ये आबा बापू गट व शेतकरी कामगार पक्ष आघाडीतून निवडी पार पडल्या. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तानाजी पाटील, अरुण शेंडे, भाऊसाहेब रुपनर, संजय रुपनर, रामलिंग झाडबुके, माजी सरपंच विजय इंगवले, कल्पना शिंगाडे, तुकाराम इंगवले, संजय आलदर, बीरासो बुरले, बाळासाहेब लेंडवे, नितीन वसेकर, सोमनाथ आळतेकर, चंद्रकांत सोनलकर, राजेंद्र लवटे आदी उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मंडलाधिकारी ननवरे यांनी सदर निवडीचे काम पाहिले. सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता.

## सांगोल्याच्या मुख्याधिकारी पदी सुधीर गवळी

**सांगोला** : सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांची आळंदी नगरपालिकेचे मुख्याधिकारी म्हणून बदली झाली आहे त्यांच्या जागी परतुर जिल्हा जालना नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुधीर गवळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुलींना स्वसंरक्षणासाठी ऑपरेशन दुर्गा बचत गट ज्येष्ठांसाठी तीन टक्के निधीची तरतूद हर घर तिरंगा वृक्ष बँक कचऱ्यापासून खत निर्मिती असे चांगले उपक्रम मुख्याधिकारी केंद्रे यांनी राबविले होते.

## नातेपुते येथे बाळासाहेबांच्या शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

**नातेपुते** : आरोग्य मंत्री डॉ.प्रा.तानाजीराव सावंत व सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली बाळासाहेबांची शिवसेना माळशिरस तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी शिवसेनेच्या तालुका पदाधिकाऱ्यांची कार्यकारणी जाहीर करून नातेपुते येथील शिवसेनेच्या कार्यालय येथे नियुक्ती पत्राचे वाटप केले.

यामध्ये तालुका उपप्रमुख सतीश सपकाळ, गटप्रमुख नातेपुते शहर दादा मुलाणी, शाखाप्रमुख नातेपुते शहर समीर शेख, मीडिया प्रमुख माळशिरस तालुका जावेद मुलाणी, नातेपुते शहर उपप्रमुख पोपट शिंदे, समिती गण प्रमुख राहुल वाघमोडे, फोंडशिरस शहर गटप्रमुख विशाल वाघमोडे, फोंडशिरस शहर उपप्रमुख सचिन बंडगर, फोंडशिरस जिल्हा परिषद गट प्रमुख स्वामी वाघमोडे, फोंडशिरस शहर उपप्रमुख रणजीत वाघमोडे, नातेपुते प्रभाग क्र. ५ उपप्रमुख गणेश कांबळे, फोंडशिरस जिल्हा परिषद गट उपप्रमुख पोपट बोराटे, फोंडशिरस शाखाप्रमुख संतोष गोरे, नातेपुते शहर उपप्रमुख आकाश सोरटे , कन्हेर जिल्हा परिषद गट प्रमुख मुन्ना मुलाणी, फडतरी शहर प्रमुख गणेश रुपनवर, फडतरी शहर उपप्रमुख सागर चव्हाण, नितीन कोरटकर दहिगाव जिल्हा परिषद गट उपप्रमुख नितीन कोरटकर, गणेश हिवरकर दहिगाव शाखाप्रमुख गणेश हिवरकर, महेश पवार, नातेपुते प्रभाग क्र. १३ शाखा प्रमुख अक्षय लांडगे, नातेपुते प्रभाग क्र .१३ शाखा प्रमुख राजू मुलाणी, नातेपुते प्रभाग क्र.११ शाखाप्रमुख गणेश ननवरे, नातेपुते प्रभाग क्र. ७ शाखाप्रमुख संदेश बरडकर, अकलूज शहर उपप्रमुख सागर धोत्रे, अकलूज शहर उपप्रमुख सचिन जाधव आदी नूतन पदाधिकाऱ्यांना पाटील यांनी निवडीचे पत्र दिले. यावेळी सोलापुर उपजिल्हाप्रमुख संतोष वाघमोडे पाटील उपस्थित होते.



### अनेकजण पक्षात येण्यासाठी इच्छुक : पाटील

सर्वसामान्य तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचून त्यांना शासनाचा लाभ मिळवून देण्यासाठी बाळासाहेबांच्या शिवसेनेची गाव तिथे शाखा निर्माण करून जनतेचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत अनेक तरुण शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी इच्छुक आहेत, असे राजकुमार हिवरकर पाटील यांनी सांगितले.

## चैतन्य हास्ययोग मंडळातर्फे हिराबेन मोदी यांना आदरांजली

**सांगोला** : पंतप्रधान मोदी यांच्या मातोश्री हिराबेन मोदी यांचे ३० डिसेंबर च्या पहाटे वयाच्या शंभराव्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले, त्यानिमित्ताने त्यांच्या स्मृतीस चैतन्य हृदययोग्य मंडळ सांगोला यांच्या वतीने आदरांजली अर्पण करण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष जगताप यांनी सांगितले की मातोश्री हिराबेन प्रमाणे शतायुषी व्हावयाचे असेल तर जीवनात हास्य व योगाचे महत्व फार मोठे आहे, त्यामुळे प्रत्येकाने जीवनात योगाचे महत्व ओळखून शतायुषी जीवनाची वाटचाल करावी. यावेळी बाळकृष्ण तेली, हेमंत तेली, जयंत तेली, डॉ. कृष्णा इंगोले, झिरपे, घोंगडे, अशोक केदार, मिलिंद पतंगे, सुधीर दौंडे, राजेंद्र ठोंबरे, उत्तम पाटोळे बाबुराव लाडे आदह उपस्थित होते.

## तत्कालीन अतिरिक्त सिईओ संतोष धोत्रे यांना पदोन्नती

**सोलापूर** : सोलापूर जिल्हा परिषदेचे तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अ धि का री संतोष धोत्रे यांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निवड श्रेणी या पदावर पदोन्नती मिळाली आहे.



ग्रामविकास विभागाने २२ डिसेंबरच्या शासन निर्णयाद्वारे ग्राम विकास विभागातील महाराष्ट्र विकास सेवा गट अ मधील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक या पदावर कार्यरत असणाऱ्या १२ अधिकाऱ्यांना निवडश्रेणी देऊन पदोन्नती केली आहे. त्यानुसार त्यांना पदस्थापना दिली आहे. सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी ठळक कामे केली. बांधकाम विभाग व लघु पाटबंधारे विभागाचे निविदा प्रक्रिया गतिमान केली. पशू संजीवनी अभियान राबवले. महा आवास अभियान, उमेद अभियान ,राज्यात नावलौकिक झाला आहे. या विभागास १२ पुरस्कार मिळाले. त्यांना अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे या ठिकाणी नियुक्ती देण्यात आली आहे.

### सोलापूर जिल्ह्यात योजनेची व्याप्ती वाढविणार

वसुंधरा पाणलोट अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात योजनेची व्याप्ती वाढविण्यास मोठा वाव आहे. राज्यात योजनेला गती देण्याबरोबर सोलापूर जिल्ह्यात विशेष लक्ष राहिल असेही वंसुधरा पाणलोटचे राज्याचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांनी सांगितले. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांचे सोलापूर जिल्ह्सात काम करत असताना चांगले सहकार्य मिळाल्याचे अपर सिईओ संतोष धोत्रे यांनी सांगितले.

### प्रकाशराव निंबाळकर

**माळीनगर** : येथील ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच प्रकाशराव पांडुरंग निंबाळकर वय ६८ वर्षे यांचे निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. माळीनगर ग्रामपंचायतीचे सदस्य विराजसिंह निंबाळकर यांचे ते वडील होत.



### आनंदीबाई पाटील

**श्रीपूर** : माळेवाडी बोरगाव (ता. माळशिरस) येथील आनंदीबाई शहाजीराव पाटील यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी वृध्दपकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भाजपाचे नेते रविंद्र पाटील यांच्या त्या मातोश्री होत.



### माणिकलाल मद्रासी

**सोलापूर** : येथील मोची समाज सुधारक मंडळ लष्करचे माजी उपाध्यक्ष माणिकलाल परशुराम मद्रासी (वय-८९)यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. रेल्वे इंजिनचे चालक म्हणून त्यांनी सेवा बजावली होती.राष्ट्रीय कबड्डीपटू तथा पोलीस कॉन्स्टेबल जगदीश मद्रासी यांचे ते वडीत होत.

## फासातून सोडविलेल्या विवाहित तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर** : दारूच्या नशेत गळफास घेतलेल्या विवाहीत तरुणाचा शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी सकाळी मृत्यू झाला.दत्तात्रय नागनाथ येलूर (वय ३५ रा. जुना विडीघरकुल) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवार दि.२६ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास त्याने घरात दारूच्या नशेत भांडण केले होते. त्यानंतर त्याने बाथरूम मध्ये जाऊन दरवाजाच्या लोखंडी अँगलला नायलॉन दोरीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून भाऊ नरेश यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारादरम्यान मरण पावला.या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## अपघातामधील जखमी तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : ढोकी (जि.लातूर) येथे टेम्पोच्या धडकेत जखमी झालेला सतीश भैरु नाईकनवरे (वय २५ रा.ढोराळा ता.कळंब जि. उस्मानाबाद) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शुक्रवारी रात्री मरण पावला. तो सोमवारी रात्रीच्या सुमारास दुचाकीवरून ढोकी ते आपल्या गावाकडे निघाला होता. ढोकी येथील पेट्रोल पंपासमोर टेम्पो धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला उस्मानाबाद येथे प्राथमिक उपचार करून गौतम जाधव (मामा) यांनी सोलापुरात दाखल केले होते.

# स्वामी भक्तांची सेवा म्हणजे खरी स्वामी समर्थांची सेवा : धनंजय पुजारी

**सुराज्य/अक्कलकोट**

श्री स्वामी सेवा बहुउद्देशीय संस्था(रजि) व शिवबसव युवा प्रतिष्ठान अक्कलकोट यांच्या वतीने स्वामी भक्तांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आले असून श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी व चोळप्पा महाराज यांचे वंशज, मार्गदर्शक धनंजय महाराज पुजारी यांच्या शुभहस्ते स्वामींच्या प्रतिमेचे पूजन करून पाणी वाटप करण्यात आले.

यावेळी मुंबईचे स्वामी भक्त जोस्तना ताई पाटील, सुलोचना फुलपगारे, समर्थ गोरे, संस्थचे अध्यक्ष रुद्रव्या स्वामी, उपाध्यक्ष विकास जकापुरे, सचिव अक्षय तारापुरे प्रतिष्ठानाचे विनायक इंडे, आकाश अळ्ळोळी, दिनेश कळ्ळीमठ, यल्लू गवंडी उपस्थित होते. श्री स्वामी समर्थांच्या सेवेकरांची स्वामींवर अपार श्रद्धा आहे. नकारात्मकता दूर करण्यासाठी स्वामींची सेवा केली जाते. स्वामीभक्त दूख:, भिती, चिंता घालवण्यासाठी स्वामींच्या पुढे नतमस्तक होतात. स्वामींभक्ताचे सेवा ही एक प्रकारची स्वामी समर्थाची सेवा असे प्रतिपादन धनंजय पुजारी यांनी व्यक्त केले. पाणी हे निसर्गाने दिलेली देणगी आहे. ३१ डिसेंबर व १ जानेवारी या दोन दिवस अक्कलकोट ला गर्दी आल्याने व उन्हाचा वाढता पारा बघून संस्थेने स्वामी भक्तासाठी स्वामी पाण्याचा सोय केले आहे. सेवा संस्था व शिवबसव युवा प्रतिष्ठान यांचे उल्लेखनीय उपक्रम राबवित आहेत.

अनेक कार्य पुढच्या काळात आपल्याकडून घडून यावीत अशी अशी अपेक्षा व्यक्त केले. याप्रसंगी सौरभ स्वामी, संदीप शेडम, गणेश सराटे, आदर्श पडणुरे, महेश स्वामी, समर्थ वांजारे, संगव्या स्वामी, रवी कडगंची, विरेश कंडगंची, केदार स्वामी, शशिकांत पोतदार, काशिनाथ शिपळे, नागेश माळी, यश कडगची आदींनी परिश्रम घेतले.





श्री स्वामी स्वामी सेवा बहुउद्देशीय संस्था ही स्वामी भक्तांच्या सेवेसाठी उदयास आले आहे. ३१ डिसेंबर व १ जानेवारी या दोन दिवस श्रीक्षेत्र अक्कलकोट तसेच गाणगापूर, तुळजापूर पंढरपूर येथे भाविकांची गर्दी असतो म्हणून अक्कलकोटमध्ये स्वामींभक्ताच्या काळजी पोटी पिण्याची पाण्याचा सोय करण्यात आली आहे.

**- रुद्रय्या स्वामी, अध्यक्ष-श्री स्वामी सेवा बहुउद्देशीय संस्था**

# नवीन वर्षातही असणार सूर्य आणि चंद्रग्रहण

## पंचागकर्ते दा.कृ.सोमण यांनी सांगितल्या महत्वाच्या गोष्टी

**नवीन वर्षा त अनेकजण नवे संकल्प करतात.. तर काहींना नव्या वर्षात काय काय घडणार आहे..याची उत्सुकता असते. खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी २०२३ मध्ये काय काय घडणार...याबाबत सांगितलं आहे. २०२३ मध्ये तब्बल ८ महिने लग्नाचे मुहूर्त आहेत. यावर्षी गणेश चतुर्थीला अंगारक योग आलेला आहे. त्याशिवाय २०२३ मध्ये ब्लूमून आणि सूपरमूनसह चंद्रगृहण आणि सुर्यग्रहण असणार आहे. पाहूयात काय सांगितलेय खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी..**




यावर्षी सन २०२२ मध्ये ३१ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजता लीप सेकंद पाळला जाणार नाही. त्यामुळे शनिवार ३१ डिसेंबर २०२२ च्या मध्यरात्री ठीक १२ वाजता नूतन वर्ष २०२३ चा प्रारंभ होणार आहे. (२) सन २०२३ हे लीपवर्ष नसल्याने फेब्रुवारी महिन्यात २८ दिवस आहेत. त्यामुळे संपूर्ण वर्षाचे दिवस ३६५ असणार आहेत. (३) सन २०२३ मध्ये चाकरमान्यांसाठी सुट्ट्यांची चंगळ असणार आहे. कारण २४ पैकी तीन सुट्ट्या शनिवारी आणि दोन सुट्ट्या रविवारी येणार आहेत. महाशिवरात्र १८ फेब्रुवारी, रमझान ईद २२ एप्रिल आणि मोहरम २९ जुलै हे दिवस शनिवारी आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती १९ फेब्रुवारी आणि दिवाळी लक्ष्मीपूजन १२ नोव्हेंबर हे दिवस रविवारी येणार आहेत. (४) सन २०२३ मध्ये १८ जुलै ते १६ ऑगस्ट २०२३ अधिक श्रावण महिना येणार आहे. त्यामुळे नागपंचमी पासून सर्व सण साधारण १९ दिवस उशीरा येणार आहेत. (५) विवाहेच्छुकांसाठी आनंदाची बातमी म्हणजे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर हे चार महिने वगळता इतर आठ महिन्यात विवाह मुहूर्त देण्यात आले आहेत. (६) गणेश भक्तांसाठी आनंदाची बातमी म्हणजे सन २०२३ मध्ये श्रीगणेश चतुर्थी मंगळवार १९ सप्टेंबरला आली असल्याने यावर्षी गणेश चतुर्थीला अंगारक योग आलेला आहे. या नूतन वर्षी मंगळवार १० जानेवारी रोजी एकच अंगारकी संकष्ट चतुर्थी आहे. (७) सोने खरेदी करणारांसाठी सन २०२३ या नूतन वर्षामध्ये एकूण चार गुरुपुष्य योग आले आहेत. ३० मार्च, २७ एप्रिल, २५ मे आणि २८ डिसेंबर रोजी गुरुपुष्य योग असणार आहेत. (८) सन २०२३ मध्ये दोन सूर्यग्रहणे आणि दोन चंद्रग्रहणे अशी एकूण चार ग्रहणे होणार आहे. पण २० एप्रिल आणि १४ ऑक्टोबरची दोन्ही सूर्यग्रहणे भारतातून दिसणार नाहीत. मात्र पाच मे रोजीचे छायाकल्प चंद्रग्रहण आणि २८ ऑक्टोबरचे खंडग्रास चंद्रग्रहण ही दोन्ही चंद्रग्रहणे भारतातून दिसणार आहेत. (९) एका इंग्रजी महिन्यात दोन पौर्णिमा आल्या तर दुसऱ्या पौर्णिमेच्या चंद्रहास ब्ल्यू मून म्हणतात. सन २०२३ मध्ये एक ऑगस्ट आणि ३१ ऑगस्ट रोजी पौर्णिमा आल्याने ३१ ऑगस्ट रोजी ब्ल्यू मून योग आला आहे. (१०) पौर्णिमेच्या दिवशी जर चंद्र पृथ्वीच्या जवळ आला असेल तर सुपरमून योग असतो. त्या दिवशी चंद्रबिंब १४ टक्के मोठे व ३० टक्के जास्त प्रकाशित दिसते. सन २०२३ मध्ये एक ऑगस्ट आणि ३१ ऑगस्ट असे दोन सुपरमून योग येणार आहेत.

(११) सन २०२३ मध्ये तिथीप्रमाणे शुक्रवार दोन जून रोजी आणि तारखेप्रमाणे मंगळवार ६ जून रोजी शिवराज शक ३५० सुरू होणार आहे. (१२) सन २०२३ मध्ये रविवार १२ नोव्हेंबर रोजी दिवाळीत नरक चतुर्दशी आणि लक्ष्मी कुबेर पूजन एकाच दिवशी येणार आहे. बलिप्रतिपदा मंगळवार १४ नोव्हेंबर रोजी आणि भाऊबीज बुधवार १५ नोव्हेंबर रोजी आहे.




## मोहोळमध्ये अंनिसतर्फे प्रबोधन रॅलीचे आयोजन

**मोहोळ** : नागनाथ विद्यालय ज्यूनिअर कॉलेज व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा मोहोळच्या वतीने मोहोळ शहरातून प्रबोधन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन प्रा. बशीर बागवान यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मोहोळचे पोलीस निरीक्षक अशोक सायकर, उपप्राचार्य प्रकाश शिंदे प्रा. संभाजी चव्हाण उपस्थित होते. 'हॅप्पी न्यू इयर, खाणार नाही, पिणार नाही बिअर',निर्धार करा व्यसन सोडा', 'गुटखा खाल्ला घाईत निघाला मृत्यूच्या,'व्यसनाचा करा धिक्कार' आदी घोषणा देत रॅली काढण्यात आली. यावेळी अंनिस अध्यक्ष श्रीधर उन्हाळे, ॲड. विनोद कांबळे, धर्मराज चवरे, सुधाकर काशीद, संजय भोसले, मनोहर गोडसे, निलेश देशमुख, साहिल शेख, माळी एम.के.राऊत ए.डी. खांडेकर एन. के. कांबळे ए.टी. वाघमोडे एस.के शिंदे, एस.बी.प्रा.श्रीमती कदम यू.के.,अशोक कांबळे, महेश माने, रमजान तांबोळी, बालाजी शेळके, अमोल महामुनी राहुल तावसकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन धर्मराज चवरे तर आभार संजय भोसले यांनी मानले.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# महात्मा बसवेश्वर महाराजांचा झेंडा काढल्याने तडवळ गावात तणाव

## तडवळ गावात व परिसरात कडकडीत बंद; बसवेश्वर महाराजांचा झेंडा पुन्हा त्याच ठिकाणी लावला

सुराज्य/अक्कलकोट

तडवळ येथे महात्मा बसवेश्वर महाराजांचा झेंडा तालुका प्रशासनानी काढल्याने संपूर्ण तडवळ गावात तणाव निर्माण झाला होता.यासाठी शनिवाार उध्दव ठाकरे शिवसेनेचे तालुकाध्यक्ष आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण तडवळ गावात कडकडीत बंद पाळण्यात आला होता.

या घटनेमुळे संपूर्ण तडवळ गावावर अन्याय झाल्याची भावना शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या कार्यकर्त्यांत निर्माण झाली होती.म्हणून आज शिवा संघटनेचे सोलापूर जिल्हा पदाधिकाऱ्यांनी संपूर्ण तडवळ गाव बंद करण्याचा निर्णय घेतला होता.त्यामुळे संपूर्ण गावात कडकडीत बंद पाळण्यात आला होता. याला संपूर्ण गावकर्यांचा ही भरघोस प्रतिसाद लाभला होता.ज्या उद्देशाने तालुका प्रशासनानी मनमानी करून महात्मा बसवेश्वर महाराजांचा झेंडा उतरविला होता,यामुळे कार्यकर्त्यांत नाराजी पसरली होती.ही माहिती शिवा संघटनेला कळताच शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा मनोहरजी धोंडे यांचे विचार घेऊन पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष



अरविंद बडोळे-पाटील, सोलापूर जिल्हाधक्ष राजकुमार सारणे, कार्याध्यक्ष आनंद बुक्कानुरे, सोलापूर जिल्हा सोशल मिडिया अध्यक्ष नागप्पा कोप्पा, उपाध्यक्ष इरेश पाटील, अक्कलकोट संपर्क प्रमुक संगमेश्वर कांबळे, रविकांत कुरे, मल्लिनाथ पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते तडवळ येथे जाऊन जोरदार घोषणाबाजी करत संपूर्ण तडवळ गाव दणाणून सोडले.तसेच महात्मा बसवेश्वर व शिवा संघटनेच्या वतीने जोरदार घोषणा देत संपूर्ण गावातून महात्मा बसवेश्वर व शिवा संघटनेचे बॅनर, फोटो व झेंडा घेऊन रॅली काढण्यात आली.यावेळी तालुका प्रशासनाच्या विरोधात निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी परमेश्वर यादवाड, आनंद बुक्कानुरे, अरविंद बडोळे-पाटील, राजकुमार सारणे, संगमेश्वर कांबळे, नागप्पा कोप्पा आदींनी जोरदार भाषण देत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. शेवटी शिवा संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच तडवळ ग्रामस्थ मिळून महात्मा बसवेश्वर महाराजांचा झेंडा पुन्हा त्याच ठिकाणी लावून पूजन करण्यात आल्याने कार्यकर्त्यांत समाधान व्यक्त करण्यात आला.



## वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

विरवडे : देशाचे माजी पंतप्रधान राष्ट्रतेज अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त व भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या वाढदिवसानिमित्त मोहोळ भाजप युवा मोर्चा तालुक्याच्या वतीने विविध कार्यकामाचे आयोजन करण्यात आले होते. कामती भागातिल गावातील गरीब व गरजू लोकांना चादरी चे वाटप आवताडे शुगरचे चेअरमन संजय आवताडे व युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अंकुश आवताडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर पाटील, उमेश बप्पा आवताडे, आवताडे मसुदेव आवताडे, शाहू आवताडे, दादासाहेब मिसाळ आधी उपस्थित होते.


## विजयस्तंभाला अभिवादनासाठी भीमसैनिक जाणार : चंदनशिवे

विरवडे : प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्या वतीने भिमा कोरेगावच्या विजयस्तंभाला अभिवादन करण्याकरिता जाणार असल्याची माहिती माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्यावतीने १ जानेवारी रोजी भीमा कोरेगावच्या विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी सोलापूर येथील प्रेरणाभूमी ते भीमा कोरेगाव पुणे येथे रॅली माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांच्या नेतृत्वाखाली निघणार आहे. पहाटे पाच वाजता बाबासाहेबांच्या पवित्र अस्थींस अभिवादन करून सदरची रॅली ची सुरुवात होणार आहे. या पत्रकार परिषदेस रवी कोळेकर, अभिजित कापुरे, अमित माने, संजय इंगळे, सुहास सावंत, संदीप कापुरे, बंटी माने, आदित्य चंदनशिवे, बाबा गायकवाड, अमित बनसोडे, चाचा सोनवणे, गणेश डोळसे, विशाल मस्के आदी उपस्थित होते.



## सांगोला येथे शासनमान्य ग्रंथालय शिबिर

सांगोला : सांगोला तालुक्यातील शासनमान्य ग्रंथालयासाठी नगरवाचन मंदिर सांगोला येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव साहेब व त्यांचे सहकारी तांत्रिक सहाय्यक प्रमोदजी पाटील यांची उपस्थिती होती. शिबिरासाठी नगरवाचन मंदिर सांगोला, कर्मचारी, सांगोला तालुका ग्रंथालय संघ, कर्मचारी संघ पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र गुलाबराव पाटील जिल्हा संचालक अमोघसिद्ध कोळी, नगरवाचन मंदिरचे सेक्रेटरी प्रा. मिलिंद फाळके यांनी सहकार्य केले.



## अक्कलकोट काँग्रेस तालुकाध्यक्षपदी तिसऱ्यांदा शंकर म्हेत्रे बिनविरोध

अक्कलकोट : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांनी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचा विस्तार केला असून अक्कलकोट तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी शंकरराव म्हेत्रे यांची तिसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली आहे. शुक्रवारी याबाबतीत अधिकृत नियुक्तीपत्र जाहीर करण्यात आले.



पक्षसंघटन व पक्षाचे विचार सर्वसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी शंकर म्हेत्रे यांची नियुक्ती केल्याचे मोहिते-पाटील यांनी सांगितले. अक्कलकोट तालुक्यासह शेजारील कर्नाटक राज्यातदेखील शंकर म्हेत्रे यांची विशेष ओळख आहे. प्रामुख्याने तळागाळातील गोरगरिबांच्या अडी-अडचणी, भांडण तंटे मिटविण्यात शंकर म्हेत्रे यांचा निरस्वार्थी पणे विशेष हातखंडा आहे.दानधर्म करण्यात स्व.सातलिंगप्पा म्हेत्रे यांचा वारसा अविरतपणे त्यांनी जपला आहे. तरूण वर्गात शंकर म्हेत्रे यांची क्रेझ मोठा असून त्यांच्या निवडीचे वृत्त कळताच दुधनीसह सबंध तालुक्यात व अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात जल्लोष करण्यात आला. यापुढील काळात काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून अविरतपणे जनसेवा करणार असल्याचे नुतन तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे यांनी सांगितले. तर आगामी अक्कलकोट व दुधनी बाजार समिती, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत यश संपादन करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे,माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील, आ. प्रणिती शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

## श्रीक्षेत्र भंडारकवठेत आज अध्यात्म सेवा पुरस्कार सोहळा

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**भंडारकवठे येथील हरि भक्त परायण स्व. अनंतराव रामचंद्र कुलकर्णी यांच्या स्मृती दिनानिमित्त रविवार दि.१ जानेवारी रोजी अध्यात्म सेवा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.**



ह.भ.प.अनंतराव कुलकर्णी



ह.भ.प.बसवेश्वर स्वामी महाराज



ह.भ.प.प्रभाकर वाघचवरे महाराज

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिराच्या प्रांगणात दुपारी चार वाजता हा सोहळा होईल. यंदाच्या या पुरस्काराचा मान उत्तर सोलापूर तालुक्यातील सीना तेलगावचे ह.भ.प.बसवेश्वर स्वामी महाराज यांना मिळाला आहे. मोहोळ तालुक्यातील कामतीखुर्दचे ह.भ.प.प्रभाकर वाघचवरे महाराज हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत. वाघचवरे महाराज यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वामी यांना सन्मानपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

श्रीक्षेत्र भंडारकवठे येथे श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर उभारण्यात अनंतराव कुलकर्णी यांनी योगदान दिले आहे तसेच सामाजिक व विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा मोठा सहभाग असायचा. या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भंडारकवठे ग्रामस्थांच्या वतीने या हा पुरस्कार दिला जातो. यंदा त्याचे सातवे वर्ष आहे. रोख रक्कम, मानपत्र व शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तरी सर्वांनी या सोहळयाला उपस्थित रहावे, असे आवाहन ग्रामस्थ व कुलकर्णी परिवाराने केले आहे. बसवेश्वर स्वामी हे गरीब कुटुंबातील आहेत. वडील तमय्या यांच्यापासून त्यांना परमार्थ सेवेची परंपरा मिळाली. दहावीत असल्यापासून त्यांनी भजन सेवेला सुरूवात केली. अकोले, गुंजेगाव, मनगोळी, सीना तेलगाव या भागातून जी भजनसेवा केली, त्यातून मोठा ग्रुप तयार झाला. श्री भजनी मंडळाच्या माध्यमातून भजनाची सेवा ते करत असतात. वडील असताना शासनाकडून एक घरकूल मिळाले. ना शेती ना बाडी. वडील गावातील पाटलांची शेती करायचे.पाटलांनी स्वामी यांच्याकडे ही शेती दिली. दिवसभर काळ्या आईची सेवा करून सायंकाळी कुणी बोलावले की,हरिभक्तीचा जागर. हाच त्यांचा दैनंदिन कार्यक्रम. स्वामी हे श्रीविठ्ठलाचे भक्त.तेलगावमधील हनुमान भजनी मंडळाच्या वतीने माघ वारीनिमित्त आणि आषाढीला आळंदी ते पंढरपूर पायी दिंडी काढली जाते. स्वामींच्या रूपाने एका गरीब शेतकऱ्याला हा पुरस्कार दिल्याने तेलगावरच्या पंचक्रोशीत आनंदाचे वातावर आहे.

## बठाणच्या सालगड्याचा मुलगा यूपीएससी परीक्षेत देशात २० वा

**संजय सलगर यांचा आज पंढरीत नागरी सत्कार**

सुराज्य/सोलापूर

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वतीने फेब्रुवारी २०२२ मध्ये घेतलेल्या भारतीय अभियांत्रिकी सेवेच्या (आयईएस) परीक्षेत मंगळवेढा तालुक्यातील बठाण गावच्या संजय राजेंद्र सलगर यांनी घवघवीत यश मिळवत देशात २० वी रँक मिळवली असून या यशाबद्दल पंढरपूर तालुका धनगर समाजाच्या वतीने रविवार १ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक येथे नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

बठाण येथील राजेंद्र सलगर हे फक्त अर्धा एकर जमीन असणारे शेतकरी असून मागील २५ वर्ष त्यांनी गावातील मोठ्या शेतकऱ्याकडे गालगडी म्हणून काम केले आहे.घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असताना ही वडीलांच्या नशिबी आलेले कष्ट व हालअपेष्टा याची जानीव ठेवीत संजय यांनी उज्ज्वल यश मिळविले असल्याने सर्वस्थरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संजय यांचे इयत्ता पहिली ते सातवीचे शिक्षण पर्यतचे शिक्षण जि. प. प्रा शाळा बठाण येथे झाले असून, आठवी ते १२ वी हे शिक्षण इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथे झाले.तर पदवीचे शिक्षण डीवाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर येथे झाले आहे.शुक्रवारी दुपारी निकाल जाहीर झाला असून सध्या ते एनएलसी इंडिया लिमिटेड (पीएसयू, भारत सरकार कोळसा मंत्रालय) मध्ये उप कार्यकारी अभियंता म्हणून तामिळनाडूत कार्यरत आहेत. यापूर्वी डीआडीओमध्ये 'रिसर्च फेलो' म्हणून काम केले आहे. संजय यांनी गेट परीक्षा चार वेळा उत्तीर्ण केली आहे.



### आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवली

वडिलांना फक्त अर्धा एकर जमीन असल्याने ते सालगडी म्हणून काम करीत होते. आई-वडील दोघे ही अशिक्षित आहेत.वडिलांनी अतिशय मेहनतीने घरची परिस्थिती बेताची असताना ही मला शिक्षणासाठी प्रोत्साहन देत 'मोठा साहेब होवून गावाचे नाव देशात कर' असा कायम सल्ला देत राहिले.तर थोरला भाऊ हा भाजीपाला व्यापारी असून थोरल्या भावाच्या सहकार्यामुळे व जिद्दीने इथपर्यंतचा प्रवास केला आहे, असे संजय सलगर यांनी सांगितले.

## रेशन दुकानाची दुसऱ्या दिवशी देखील झाडाझडती

### अधिकाऱ्यासमोर ग्राहकांचा रोष, धान्य वेळेत मिळत नसल्याच्या तक्रारी

सोलापूर : सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून वाटप केल्या जाणाऱ्या रेशन दुकानाची जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी शुक्रवारी अचानक झाडाझडती घेतली. जिल्हाधिकाऱ्यांच्या ॲक्शन मोड नंतर आता पुरवठा विभाग देखिल सर्तक झाला आणि शनिवारी चार परिमंडल विभागातील प्रत्येकी एक या प्रमाणे चार दुकानाची झाडाझडी घेतली असता अधिकाऱ्यांना ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. वेळ आणि कमी धान्य मिळत असल्याच्या तक्रारी करत रेशन दुकानदारांच्या तक्रारींचा पाढा वाचला.



जिल्हाधिकारी शंभरकर यांनी अचानक केलेल्या या तपासणीमुळे दुकानदारांमध्ये एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, काळाबाजार करणाऱ्या दुकानदारांचे धाबे दणाणले होते.राज्य शासन आणि केंद्र शासनाच्यावतीने रेशन दुकानातून दिले जाणारे धान्य गोरगरिबांना मिळते का याची तपासणी करण्याच्या सूचना राज्य शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानुसार तपासणी केल्या जात आहेत. शनिवारी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने जिल्हापुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, परिमंडल अधिकारी सुरेश गायकवाड, नितीन वाघ, अनिल गवळी , पुरवठा निरीक्षक अनिल शहापुरे यांच्या पथकाने चारही परिमंडल विभागातील प्रत्येकी एक या प्रमाणे चार दुकानाची तपासणी केली. अ परिमंडळ विभागातील लिंगशेट्टी मंगल कार्यालयाजवळ असलेल्या बाबुराव म्हमाणे यांचे दुकान नंबर एक, ब परीमंडल विभागातील विधवा कल्याण मंडळाच्या माध्यमातून घोंगडे वस्ती येथील प्रकाश शंकुर यांचे दुकान नंबर ३२ तर क परिमंडळ विभागातील शरदचंद्र सहकारी ग्राहक संस्थाचे दुकान नंबर ३३ तर ड परिमंडळ विभागातील मनिष सहकारी ग्राहक संस्थाचे दुकान नंबर ३७ या चार दुकानाची कसून तपासणी केली. धान्याची तपासणी करत रजिस्टर मधिल धान्याची नोंद आणि पॉस मशिन मधिल नोंदीची तपासणी केली आयएसओ मानकन प्रमाणाने दुकानात सर्व सोई आहेत का? सर्व ग्राहकांच्या माहितीसाठी फलक लावले आहेत का? याची तपासणी केली. यावेळी दुकानात धान्य घेण्यासाठी आलेल्या ग्राहकांची संवाद साधत चौकशी केली धान्य वेळेत मिळते का करताच अधिकाऱ्यांना ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. धान्य वेळेवर मिळत नाही, धान्यासाठी हेलपाटे मारावे लागतात कमी धान्य मिळते अशा तक्रारी तपासणीच्या वेळी ग्राहकांनी तपासणी अधिकाऱ्यांकडे केल्या या दुकान तपासणीचा आहवाल शासनास सादर केला जाणार आहे.



# अमृत योजनेतून

# निधी मिळाल्यावरच शहराचा पाणीपुरवठा नियमित होणार


## लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा करण्याची गरज

सुराज्य/सोलापूर

सध्या उजनीतून रोज १८० एमएलडी पाणी उचलूनही चार-पाच दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. जुनी पाईपलाईन व पाण्याची गळतीमुळे तशी अवस्था आहे. त्यावर उपाययोजनांसाठी महापालिकेकडून ५६२ कोटींच्या अमृत - २ चा जलवाहिनी कामा संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. तो आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे आहे. तेथे मान्यता मिळाल्यानंतर शासन निधीस पुढे मान्यता मिळणार आहे. आता अमृत योजनेतून लवकर निधी मिळावा, शासाठी सर्वांनाच शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. त्यानंतर सोलापूकरांचे नियमित पाण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

सोलापूर शहराला नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी समांतर जलवाहिनी टाकण्यात येत आहे. ही जलवाहिनी झाल्यानंतरही नियमित पाणीपुरवठ्यासाठी अंतर्गत पाईपलाईन दुरुस्ती गरजेचीच आहे. शहराला नियमित पाणीपुरवठा होईल, एवढे पाणी सध्या उपलब्ध असतानाही गळती व नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांना चार-पाच दिवसाआड पाणी मिळत आहे.

सध्या जुळे सोलापूरला तीन दिवसाआड पाणी, कंबर तलाव ते सैफुल या परिसरातील उजव्या बाजूला चार दिवसांऐवजी तीन दिवसाआड पाणी दिले जात आहे. नववर्षापासून पाणी पुरवठा एक दिवस अगोदर करण्याचे नियोजन असल्याचे नूतन आयुक्त शितल तेली उगले यांनी सांगितले आहे.



महापालिकेने नियमित पाणीपुरवठ्याचा ५६२ कोटींचा आराखडा शासनाला सादर केला. तो प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे (एमजेपी) तांत्रिक मंजुरीसाठी पाठविला गेला. त्याठिकाणी काही त्रुटी काढण्यात आल्या असून आता तो प्रस्ताव त्रुटींच्या पूर्ततेसाठी पुन्हा महापालिकेकडे पाठविण्यात आला आहे. त्यानंतर त्रुटींची पूर्तता करून महापालिका आयुक्तांनी तो पुन्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठवला आहे. तत्पूर्वी, महापालिकेला ३० टक्के हिस्सा द्यावा लागणार आहे.

स्मार्टसिटीतून होणाऱ्या समांतर जलवाहिनीसाठी देखील महापालिकेला हिस्सा द्यावा लागणार आहे. आता अमृत योजनेतून लवकर निधी मिळावा, यासाठी सर्वांनाच शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. त्यानंतर सोलापूकरांना नियमित पाणीपुरवठा होणार आहे.

# हिवाळी अधिवेशन ठरले टिका-टोमणे आणि नवख्यांसाठी पर्यटन स्थळ

### लक्ष्मण ढोबळे यांनी व्यक्त केली खंत

सुराज्य/सोलापूर

**नागपूर हिवाळी अधिवेशनात काही चुकीच्या राजकीय प्रथा रूढ होऊ लागल्या. नागरिकांच्या प्रश्न सोडवण्याचे हे व्यासपीठ आता भाषणबाजी, टीका-टोमणे आणि नवख्या आमदार, मंत्र्यांसाठी पर्यटन स्थळ ठरू पाहात असल्याची खंत भाजपचे प्रांतिक सदस्य, माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी व्यक्त केली.**



सध्या काळातील अधिवेशनाबाबत बोलताना म्हणाले की, 'राजकारणाचे रंगरूप पूर्णपणे बदलून गेले असून तरुणपणातली कमी वयातली पोर आमदार म्हणून सभागृहात आली त्यामध्ये प्रथम सरपंच त्यानंतर झेडपी, नगराध्यक्ष आणि मग आमदार अशा कामाच्या अनुभवांवर सभागृहात आमदार झाले. अशी फार थोडी माणसं आता या विधीमंडळात उरली आहेत. विविध स्तरातून, कामातून चळवळींचा सराव असलेली नेते सभागृहात यायची. तो निकषच आता दूर झाला आहे. सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर तरुण आमदारांची संख्या सभागृहात वाढली असून आत्ता महाराष्ट्राचे भले होईल, असे मतदारांना वाटत होते. परंतु सहा महिन्यात वकुब नाही, अनुभव नाही, सर्वांना घेऊन जाण्याबद्दल संस्कार नाहीत. प्रश्नांच्या मांडणीची अजिबात सवय नाही. फक्त पैसा पेरला आहे. कोणत्याच पक्षाचा वर्कशॉप नाही. प्रश्नं कशी मांडावीत? याचे भान उरले नसल्याची खंत ढोबळे यांनी व्यक्त केली.

उपस्थित आमदारांनी कुणाच्या बापाला भीत नाही हा बुळचट वाक्यप्रचार आठ दिवसात २० वेळा ऐकला. बापाचा उध्दारापेक्षा नेत्याच्या काळजात शेतकऱ्याचे हित असायला हवे होते. परंतु, वीजेपासून पाण्यापर्यंत अजितराव या प्रश्नाकडे फिरकतच नव्हते. हिवाळी अधिवेशन एकमेकांना हिणवण्यात ओरखाडा काढण्यात टोमणा मारण्यात १५ दिवस निघून गेले. यामुळे रस्ते, पाणी, वीज, शिक्षण या गोष्टी बाजूला होत गेल्या, असेही ढोबळ म्हणाले.



# अखंड हरिनाम सप्ताहास सुशीलकुमार शिंदेंची उपस्थिती

सुराज्य/सोलापूर : अखिल भारतीय वारकरी मंडळ शहर व जिल्ह्याच्यावतीने श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त जूनी मिल कंपाउंड येथे अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळा सुरू आहे. याला माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि आ. प्रणिती शिंदे यांनी सहभगा नोंदवला. ह.भ.प. श्रीगुरु प्रकाश महाराज बोधले (राष्ट्रीय अध्यक्ष) यांच्या प्रेरणेने, तसेच हभप डॉ. किरण महाराज बोधले (जिल्हा अध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह १ जानेवारीपर्यंत सुरु आहे. यावेळी सुशीलकुमार शिंदे, आमदार प्रणिती शिंदे यांनी हरीभक्तांसह यात सहभागी होऊन हभप मुकुंद महाराज जाट देवळेकर यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी सुभाष महाराज शिंदे, श्रीकांत महाराज कोकितकर, भास्कर महाराज पवार, शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, मा. नगरसेवक विनोद भोसले, पृथ्वीराज नरोटे, शाहु सलगर, दीनानाथ शेळके, बसु कोळी, सौरभ सालुंखे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# विवाहितेचा छळ ; पतीसह सात जणांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर : लग्नात मानपान केला नाही व तसेच १४ लाख आण म्हणत विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी आसिया सुलेमान मुल्ला (वय-२१, रा. अंबिका नगर) यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती सुलेमान मुल्ला, सासू नसीमा मुल्ला, सासरे इस्माईल मुल्ला, अकलाक मुल्ला, जाऊ जरीना मुल्ला, नणंद आयेशा आसिफ शेख, आसिफ अकलाक शेख (सर्व रा. जिब्राहील मस्जिदच्या पाठीमागे, बी नवीन विडी घरकुल, सोलीपूर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पो. हे.कॉ. नवले हे करीत आहेत.

# लग्नासाठी मुलगी मिळेना; चिंताग्रस्त तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/वरवडे बु. : लग्न म्हणजे दोन जीवांचे मिलन प्रत्येक तरुण-तरुणी वयात आल्यावर लग्नाची स्वप्न पाहतो. पण कोरवली (ता. मोहोळ) येथील भीमाशंकर काशिनाथ म्हमाणे याचे लग्नाचे स्वप्न हे अधुरेच राहिले. लग्न जमत नसल्यामुळे २२ वर्षीय भीमाशंकरने गळफास घेऊन आत्महत्या केली.



कोरवली (ता. मोहोळ) गावात राहणारा भीमाशंकर म्हमाणे या तरुणाने मागील वर्षी कर्नाटकातील गुलबर्गा येथील महाविद्यालयात डी फार्मसीची पदवी घेतली होती. स्वतः चा व्यवसाय करावा हे त्याने ठरवले असताना त्याच्या कुटुबियांनी नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडे मुलगी पाहण्याचा कार्यक्रम सुरू झाला.

गेल्या एक वर्षापासून त्याच्यासाठी लग्न स्थळ पाण्याचा कार्यक्रम सुरू होता. बऱ्याच ठिकाणची स्थळे बघितली पण मुलीकडून नकार मिळत होता. शेवटी त्याने २९ डिसेंबर रोजी शिवानंद ईराण्णा पाटील यांच्या शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास घेतला. या घटनेची माहिती कामती पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी जाऊन भीमाशंकर याचा मृतदेह ताब्यात घेऊन तो शवविच्छेदनासाठी पाठवला. त्याच्यावर शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**नैराश्यग्रस्त होता भीमाशंकर**

लग्न न जमल्याने भीमाशंकर म्हमाणे हा तरूण नैराश्यग्रस्त झाला होता. तो सतत मित्र व नातेवाईकांना मी आज आहे तर उद्या नाही माझ्या जीवनाचे काय खरे नाही अशी खंत सतत बोलून दाखवली होती.

# केस मागे घे म्हणत, चाकूने केला वार

सुराज्य/सोलापूर : केस मागे घे, असे तुफान हाणामारी करत घरातील साहित्याची तोडफोड करून वीस हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. २९ डिसेंबर रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास भवानी पेठ अक्कलकोट रोड येथे घडली. याप्रकरणी संतोष सिद्धय्या स्वामी (वय-२५, रा. भवानी पेठ, अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दोन अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. संतोष हे जेवण करून घरात असताना वरील संशयित आले आणि यांच्या घरात घुसून शिवीगाळ करत तु दाखल केलेली केस माघारी घेतो का नाही, असे मारहाण केली. यांच्या पत्नीला व भावाला दम देत साहित्याची तोडफोड करून २० हजार रुपयांचे नुकसान केले. अधिक तपास स.पो.नि. कुकडे हे करीत आहेत.

**फरशीने मारहाण**

उसने पैसे मागण्यास गेल्यावर लाथा बुक्क्यांनी मारहाण करत डोक्यात फरशी घालून जखमी केल्याची घटना दि. २९ डिसेंबर रोजी दु. ४च्या सुमारास बसवेश्वर तांडा देगाव येथे घडली. याप्रकरणी दामोदर भानुदास गायकवाड (वय-२७, रा. बसवेश्वर तांडा) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गणेश अंकुश पवार (रा. बसवेश्वर तांडा) व पांडुरंग चव्हाण (पत्ता माहित नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोहेकाँ गायकवाड करीत आहेत.

# पिलीव येथे अनेक दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील प्रभाग क्रमांक चारमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पिण्याच्या पाण्यामध्ये जंतु येत आहेत. यामुळे या प्रभागातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. याठिकाणी पाणीपुरवठा करणारी यंत्रणा ताबडतोब बदलून नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांनी सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे. याविषयी पिलीवचे सरपंच नितीन मोहिते यांना विचारले असता याठिकाणी दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे, याची ग्रामपंचायतने खात्री केली आहे. विहिरीतून तर शुद्ध पाणीपुरवठा होत आहे. पण पाईपलाईन लिकेज असण्याची शक्यता आहे. ते शोधून लवकरच शुद्धपाणीपुरवठत्त होईल, असे सांगितले. विरोधी नागरी आघाडीचे सदस्य जिवन गुरव या दूषित पाणीपुरवठ्याविषयी मी सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांना गेल्या दोन वर्षापासून सांगत आहे, पण त्यांच्याकडून अद्याप काम झाले नसल्याचे सांगितले.

# अज्ञात चोरट्याने घरातून मोबाईल पळविला

सुराज्य/सोलापूर : घराचा दरवाजा न लावता झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील महागड्या कंपनीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना दि.२९ डिसेंबर रोजी पहाटेच्या दरम्यान घडली.

याप्रकरणी विशाल ज्ञानदेव कोकणे (रा.सोनिया नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोहे. गवळी हे करीत आहेत.



# शहाजी हायस्कूलच्या मुलींचे टेनीकाईट स्पर्धेत यश

सुराज्य/अक्कलकोट : येथील मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूलच्या १४ वर्षाखालील मुलींनी जिल्हास्तरीय टेनीक्वाईट स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले. क्रीडा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय टेनीक्वाईट स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेतील १४ वर्षाखालील मुलींच्या गटात अक्कलकोट येथील मराठा मंदिर शहाजी हायस्कूलच्या मुलींनी चांगली लढत देऊन उपविजेतेपद मिळविले. या मुलींच्या संघात प्रणिती माने-कर्णधार, दिव्या माळी-उपकर्णधार, लक्ष्मी गवंडी, गायत्री कवटगी व गायत्री शिंदे यांचा समावेश होता. खेळाडूंचे मराठा मंदिर मुंबईचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख, सरचिटणीस दीपकराव देशमुख,विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार, उपाध्यक्ष शिवाजीराव भोसले, सचिव मनोहर साळवी, सुदाम पाटील, शालेय समिती सदस्य सुरेश फडतरे, बाबासाहेब निंबाळकर, अमोलराजे भोसले मुख्याध्यापक सुदेश कांबळे, उपमुख्याध्यापक शिवाजी भांगरे व ज्येष्ठ शिक्षक राजेश पडवळकर यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक रविकिरण इंगळे व अमोल कोकाटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# अक्कलकोटमध्ये वाढतेय वाहतुकीची कोंडी

## नागरीक होतोय त्रस्त; उपाय योजना करण्याची गरज

सुराज्य/अक्कलकोट

**श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी वाढत चाललेली गर्दी पाहता वाहनतळ, एकेरी वाहतुक, नो-पार्किंग झोन, दिशादर्शक फलक यासह होत असलेली वाहतुकीची कोंडी याबाबत विविध उपाय योजना करणे काळाची गरज आहे.**



श्री वटवृक्ष मंदिर, समाधी मठ, अन्नछत्र मंडळ, बसस्थानक, मेन रोड, मंगरुळे चौक बायपास, मल्लिकार्जुन मंदिर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असल्याने स्वामी भक्तांसह स्थानिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तत्कालीन पोलिस निरीक्षक सूरज बंडगर यांनी वाहतुकीला शिस्त लावण्याकामी केलेले प्रयत्न आजही शहरवासियांतून कौतुक होताना दिसत आहे. त्यांच्या बदलीनंतर आजतागायत वाहतुकीचा खेळखंडोबा संपायलाच तयार नाही. होत असलेल्या वाहतुकीच्या कोंडीबाबत प्रशासनाने वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे आहे.

शहर वाहतुकीला शिस्त नसल्याने स्थानिक व स्वामी भक्तांना याचा फटका बसत आहे. शहरातील जडवाहतुक थांबवावी, अशी जुनी मागणी रास्त असताना अद्यापही यावर कारवाई झालेली नाही. अनेक मोठ्या व्यापाऱ्यांचे गोदाम हे जुन्या अडत बाजाराच्या परिसरात थाटलेली आहेत. सकाळी भाजीपाला मार्केट हे याच ठिकाणी भरतो. मात्र जड वाहतुकीमुळे भाजी विक्रेत्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. लक्ष्मी मंडईची जागा ही लहान पडत असून मंडईचा पत्राशेड हा जुना झाला असून सध्याची लोकसंख्या पाहता अद्यावत मार्केटची गरज आहे. हा देखील कळीचा मुद्दा असून याचा देखील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये समावेश करण्याची मागणी पुढे येत आहे.

# मृत अर्भक मिळाल्याप्रकरणी अज्ञातावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

भवानी पेठेतील एसटी चौक प्लस टेलरच्या दुकानासमोर मानवी अर्भक हे जन्माला येण्याआधीच त्याचा मृत्यू घडवून आणून व ती अपत्य जन्माची माहिती लपवून त्याची विल्हेवाट लावल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.३० डिसेंबर रोजी दुपारी घडली.

याप्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल नितीन बाबूराव भोगशेट्टी यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पवार हे करीत आहेत.



# संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप

सुराज्य/अकलूज

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त संचालक वसंत पांडुरंग जाधव यांच्यातर्फे खाऊ वाटप करण्यात आला. आनंदनगर जिल्हा परिषद केंद्र शाळेअंतर्गत येणाऱ्या चाकोरे, कोंडबावी व आनंदनगर येथील प्राथमिक शाळेतील व अंगणवाडीमधील ८०० विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, अमोल गायकवाड, महादेव जाधव, राजेंद्र जाधव व आनंदनगर गावातील सामाजिक कार्यकर्ते दादाराम जाधव, वेताळ काटकर, चांगदेव भांगे, सुनील चव्हाण, अविनाश जाधव सर, विजय जाधव, माऊली दांगट व समस्त आनंदनगर ग्रामस्थ उपस्थित होते.



# लौकिक शिक्षणाबरोबरच मौखिक शिक्षण देणे गरजेचे : रणदिवे

सुराज्य/सोलापूर : लौकिक शिक्षणाबरोबर मौखिक शिक्षण ही मुलांना दिले गेले पाहिजे, संयम हे उन्नत आत्म्याचे सिंहासन आहे, त्यातूनच तरुण पिढी संस्कारक्षम घडेल. विचारांना आचरणाची जोड द्यावी, व त्याप्रमाणे आपली जगणे असावे, असे विचार ए. बी. रणदिवे यांनी व्यक्त केले. विजापूर रोडवरील नूतन प्रशालेमध्ये समंतभद्र महाराज जयंती प्रित्यर्थ ते बोलत होते.

समंतभद्र महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक एस. एन. शहापुरे सर यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक पी. एस. आराध्ये यांनी केले. यावेळी रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. १७२ विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. यावेळी विद्यार्थ्यांना लाडूचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बिराजदार यांनी केले.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत नान्नज बीटचे वर्चस्व

सुराज्य/उत्तर सोलापूर

**विश्वशांती गुरुकुल केगाव येथे उत्तर सोलापूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत नान्नज बीटचे वर्चस्व ठरले. स्पर्धेचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी बापूराव जमादार यांच्या हस्ते, शिक्षण विस्ताधिकारी हरिश राऊत, विश्वशांती गुरुकुलचे प्राचार्य पुराणिक, स्वप्निल शेठ, शिक्षक संघाचे अध्यक्ष म. ज. मोरे, तालुकाध्यक्ष अनिरुद्ध पवार, विस्ताराधिकारी सिद्धेश्वर निम्बर्गी, केंद्रप्रमुख निम्बर्गी, कटकधोंड, बनसोडे, वाघमोडे, राजपूत, बाबा माने यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.**

या स्पर्धेत ३९० खेळाडूंनी सहभागी होते. या स्पर्धेत खो-खो, कबड्डी, लंगडी अशा सांघिक प्रकारात तर १०० मीटर, २०० मीटर धावणे, बुद्धिबळ अशा वैयक्तिक क्रीडा प्रकार घेण्यात आला. पंच म्हणून किशोर गुंड, अर्जुन दळवी, सारंग पाटील, गौतम आतकरे, विठ्ठल शिंदे शिवशंकर राठोड, चव्हाण, गोकुळ यादव यांनी काम पाहिले. स्पर्धेचे नियोजन शहानवाज मुल्ला, पांडुरंग सुर्वे, शिवाजी वसपटे यांनी केले होते.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे**

(कबड्डी) लहान गट मुले- जि. प. शाळा कारंबा, नान्नज बीट, मुली- जि. प. शाळा कोंडी (नान्नज बीट), मोठा गट मुले (कबड्डी)- जि. प. शाळा पडसाळी (नान्नज बीट), मुली- जि. प. शाळा पडसाळी (नान्नज




बीट), लंगडी लहान गट मुले - जि. प. शाळा तेलगाव (देगाव बीट), मुली- जि. प. शाळा तेलगाव (देगाव बीट), मोठा गट मुले लंगडी-जि. प. शाळा तेलगाव (देगाव बीट), मुली- जि. प. शाळा पाथरी (देगाव), खो-खो लहान गट मुले- जि. प. शाळा कारंबा (नान्नज बीट), मुली - जि. प. शाळा कारंबा (नान्नज बीट), मोठा गट मुले खो-खो- जि. प. शाळा कौठाळी (नान्नज बीट), मुली- जि. प. शाळा पाथरी (देगाव बीट), १०० मीटर धावणे मुले- अथर्व गायकवाड, कारंबा मुली- संध्या बेळे- नंदुर, मोठा गट- समर्थ माळी (हिरज), मुली-श्रेया गणेश माने (कौठाळी), २०० मीटर -धावणे लहान गट मुले- जियान मोसिन शेख (कवठे), मुली संध्या बेळे - मोठा गट मुले २०० मीटर-सागर बाबासाहेब भोसले (कौठाळी) मुली- कविता सुनील राठोड (प्रताप नगर), बुद्धिबळ - लहान गट मुले शर्विर ज्ञानदेव नागणे (पडसाळी), मोठा गट मुले- गुरुप्रसाद विष्णू कोळी (बानेगाव), छोटा गट मुली - श्रेया गणपत माळी (कौठाळी), मोठा गट मुली - अंजली बाळू सुरवसे (बाळे).

### नावात बदल

मी (JAYAVANT TULASHIRAM JAGTAP S/o. किंवा डी/ओ (TULASHIRAM), पत्ता: (१ भीमनगर, यावली) ने माझे नाव ०८/१२/२०२२ च्या प्रतिज्ञापत्राद्वारे JAYVANT TULASHIRAM JAGTAP वरुन (JAYAVANT TULASHIRAM JAGTAP) असे बदलले आहे.

# उद्यापासून राज्यस्तरीय उत्कर्ष सांस्कृतिक महोत्सव

## सोलापूरला दुसऱ्यांदा यजमानपदाची संधी; जय्यत तयारी सुरू

✔ सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ ते ५ जानेवारी २०२३ दरम्यान विद्यापीठाच्या दीक्षांत सभामंडप येथे राज्यस्तरीय १३व्या उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.**

या राज्यस्तरीय उत्कर्ष महोत्सवाचे उद्घाटन दि. २ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री विकासचंद्र रस्तोगी यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या उद्घाटन सोहळ्यास राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांत कुमार वनंजे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्य ब्रँड अँबेसिडर (सदिच्छा दूत) प्रिया पाटील, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. राजेश गादेवार तसेच कुलसचिव योगिनी घारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उत्कर्ष राज्यस्तरीय महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण दि. ५ जानेवारी २०२३ रोजी स. ११ वाजता सोलापूरचे जागतिक कीर्तीचे सुंदरी वादक पंडित भीमण्णा जाधव यांच्या हस्ते होईल. कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली समारोपचा हा सोहळा होईल.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांत कुमार वनंजे, कुलसचिव योगिनी घारे यांची




प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

राज्य सोलापूर विद्यापीठास दुसऱ्यांदा उत्कर्ष महोत्सवाच्या यजमानपदाची संधी दिली आहे. यापूर्वी २०१० मध्ये सोलापूर विद्यापीठात पार पडला होता. यंदा देखील तेवढ्याच शिस्तबद्ध नियोजनात व दिमाखात हा सोहळा पार पडेल, अशी तयारी व नियोजन विद्यापीठाकडून करण्यात आल्याचे कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

या पत्रकार परिषदेस कुलसचिव योगिनी घारे, वित्त व लेखाधिकारी सीए श्रेणीक शाह, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. गुणवंत सरवदे, उत्कर्ष महोत्सवाचे समन्वयक डॉ. केदारनाथ काळवणे, जनसंपर्क अधिकारी राहुल वंजारे, डॉ. अंबादास भासके उपस्थित होते.

### १७ विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

राज्यस्तरीय उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवामध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण १७ विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग राहणार आहे. प्रत्येकी एका संघामध्ये १८ विद्यार्थ्यांचा व एका संघप्रमुखाचा सहभाग राहणार आहे. या सर्व विद्यार्थ्यांची, संघ व्यवस्थापक तसेच परीक्षकांच्या निवास व भोजनाची सोय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून केली जाणार असल्याचे कुलसचिव योगिनी घारे यांनी सांगितले. या महोत्सवाच्या नियोजनासाठी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या कार्यरत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**असे राहणार कार्यक्रम :** दि. २ जानेवारी : दु. २ वा. राज्यभरातील विद्यापीठाच्या संघांचे आगमन व नाव नोंदणी, दु. ४ वा. पथसंचलन-शोभायात्रा, सायं. ६ वा. उद्घाटन, रात्री ९.३० वाजता संघव्यवस्थापकांची बैठक होईल. दि. ३ रोजी सकाळी ८ वा. भारतीय लोककलेचे सादरीकरण, स. १०.३० वाजता कार्यप्रसिद्धी अहवाल प्रदर्शन, स. ११ वा. भारतीय लोकवाद्याचे सादरीकरण, दु. २.४० मिनिटांनी संकल्पना नृत्य, सायं. ५ वा. कवितेचे सादरीकरण होईल. दि. ४ रोजी स. ८.३० वा. पथनाट्याचे सादरीकरण होईल. स. ११.३० वा. निबंध स्पर्धा, दु. २.३० वा. समूहगीत, सायं. ५.३० वा. भित्तिचित्रे तसेच वक्तृत्व स्पर्धा होईल. दि. ५ रोजी स. ९ वा. संघ व्यवस्थापकांची बैठक व स. ११ वा. पारितोषिक वितरण व समारोप होईल.



## आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्यांचे वाटप

✔ सुराज्य/मोहोळ : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त रिपाइं युवक आघाडीच्यावतीने कोळेगाव येथे शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच वाटप करण्यात आले. युवक आघाडीच्यावतीने मोहोळ तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक अ‍ॅड. आकाश कापुरे यांनी केले. जिल्हा खजिनदार विठ्ठल क्षीरसागर, युवक अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस पोपट कापुरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.

मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना कुमार ढवळे यांचे हस्ते फळे वाटप करण्यात आले. यावेळी युवक सरचिटणीस सुनील जंवजाळ, युवक संघटक अमोल जगताप, युवक खजिनदार केदार कांबळे, शिक्षण कमिटी अध्यक्ष दादा कापुरे, आकाश विधानसभा अध्यक्ष महेश कुचेकर, युवक कार्याध्यक्ष आबासाहेब कुचेकर, तालुका संघटन सचिव अमोल जगताप, युवक तालुका उपाध्यक्ष साजन जगताप, प्रवीण शेंडगे, सुशील शेंडगे, सुनील जवजाळ, महेश कुचेकर, आबासाहेब कुचेकर, अमोल जगताप, साजन जगताप, प्रवीण शेंडगे, सुशील शेंडगे आदी उपस्थित होते.



## सरपंच खंडागळे यांचा नाभिक समाजातर्फे सत्कार

✔ सुराज्य/नाझरे : लोकनियुक्त (चिनके, ता. सांगोला) येथील सरपंच नाथाभाऊ खंडागळे यांची नाभिक समाज मंदिर नाझरे येथे समाजातर्फे भव्य सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी माजी सरपंच विनायक मिसाळ हे होते. राजकारण कमी परंतु समाजकारण यावर भर देऊन गावच्या विकासासाठी प्रयत्न करू, असे अध्यक्षीय भाषणात माजी सरपंच विनायक मिसाळ यांनी सांगितले. यावेळी रविराज शेटे, विनायक मुळे, दादासाहेब हरिहर यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी अतुल फसाले, गजेंद्र काळे व सरपंच नाथा खंडागळे यांनीही मत व्यक्त केले. यावेळी उपसरपंच शशिकांत पाटील, ग्रामपंचायत सदस्य संजय खंडागळे, दीपक खंडागळे, हनुमंत खंडागळे, विष्णू खंडागळे, एकनाथ चव्हाण, पांडू खंडागळे, हरी काळे, सेवानिवृत्त मुख्या. ज्ञानेश्वर मिसाळ, नवनाथ काळे, अमित चव्हाण, राहुल चन्ने, महादेव खंडागळे, सुनील खंडागळे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार तातोबा जावीर यांनी मानले.



## हितेश राजपाल यांची अन्नछत्र मंडळास भेट

✔ सुराज्य/अक्कलकोट : भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाचे उपसचिव हितेश राजपाल यांनी अक्कलकोट येथील अन्नछत्र मंडळाला सहकुटुंब सदिच्छा भेट दिली. मंडळाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी महसूल प्रशासनातील ओ. एम. माने, पंचप्पा म्हेत्रे, सुनील नंदीकोले व मंडळाचे सिद्धाराम कल्याणी, एस. के. स्वामी, अभियंता अमित थोरात, बाळू पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, प्रवीण घाडगे, प्रसाद हुल्ले, निखिल पाटील, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण उपस्थित होते.



## शिरवळला जादा बसेसची मागणी

✔ सुराज्य/अक्कलकोट : तालुक्यातील शिरवळ, सदलापूर, शिरसी , किणीमोड तांडा गावातील जवळपास १०० ते १५० विद्यार्थी दररोज शिरवळ येथून शिक्षणासाठी अक्कलकोटला ये जा करतात. परंतु बाहेरून येणाऱ्या सर्व बसेस पूर्ण क्षमतेने भरून येतात. त्यामुळे शिरवळ येथील मुलांना बसमध्ये घेतले जात नाही. त्यामुळे गावाला जादा बस रोज सुरू करावी, अशी मागणी भाजप जिल्हा सरचिटणीस अप्पासाहेब बिराजदार यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळ अक्ककोटच्या आगार प्रमुख रमेश मंथा यांना निवेदन दिले. यावेळी यावेळी तंटामुक्त अध्यक्ष अप्पू देवकर, महिबूब हवालदार, शिवानंद निंबाळे, प्रतिक कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## एटीएमची अदलाबदल करून वृद्धाला फसवले

✔ सुराज्य/सोलापूर : एटीएम कार्डची अदलाबदल करत दोन इसमांनी वृद्धाला ५१ हजारांना फसवले. ही घटना दि. १५ डिसेंबर रोजी सायं. सव्वा सहा वाजण्याच्या दरम्यान एसबीआय एटीएम ट्रेझरी शाखा येथे घडली. याप्रकरणी दत्तात्रय शिवय्या चिलवेरी (वय-६४, रा. वारद चाळ, मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## मोटारसायकलीच्या धडकेत महिला जखमी

✔ सुराज्य/सोलापूर : नियोजन भवनसमोर मोटार सायकलवरील चालकाने महिलेस धडक देऊन जखमी केले. ही घटना दि.१८ डिसेंबर रोजी घडली. या प्रकरणी सरस्वती तानाजी बोरकर (वय-४५, रा. जुनी मिल चाळ यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. उमा मेडिकलमधील मुलाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## भाजपाच्या प्रज्ञावंत आघाडीच्या जिल्हा संयोजकपदी पांढरे

✔ सुराज्य/मोहोळ

भाजपाच्या सोलापूर जिल्हा प्रज्ञावंत आघाडीच्या जिल्हा संयोजक पदी मोहोळचे माजी शहराध्यक्ष अविनाश पांढरे यांची नियुक्ती करण्यात आली असून निवडीचे पत्र भाजपाचे राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते त्यांना नुकतेच देण्यात आले.

शहराध्यक्ष अविनाश पांढरे हे लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आहेत. सामाजिक क्षेत्रासह शेतीशी निगडित व त्यांच्या संघटनात्मक कार्याची दखल घेऊन त्यांची नुकतीच सोलापूर



जिल्हा प्रज्ञावंत आघाडीच्या जिल्हा संयोजकपदी निवड करण्यात आली आहे. भीमा साखर कारखान्याची माजी चेअरमन खा. धनंजय महाडिक यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी प्रज्ञावंत आघाडीचे जिल्हा संयोजक अमोल कुलकर्णी, भाजपाचे तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, माजी तालुकाध्यक्ष संतोष नामदे, संघटन सरचिटणीस महेश सोवनी, ज्येष्ठ पत्रकार मदन कुलकर्णी आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान पांढरे यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## 'उर्दू देशप्रेमी गीत' राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा कार्यक्रम : मो. अयाज

✔ सुराज्य/सोलापूर

**खादिमाने उर्दू फोरम सोलापूरची उर्दू देशप्रेमी गीत स्पर्धा राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारी व स्वातंत्र्यलढ्यात शहीद झालेल्या शहीद राम प्रसाद बिस्मिल व शहीद अशफाकुल्लाह खान याना सलामी देणारी आहे, असे उद्गार महाराष्ट्राचे गौरव व महागायक विजेते मो. अयाज़ यांनी काढले.**

खादिमाने उर्दू फोरमच्या सातव्या आंतरशालेय उर्दू देशप्रेमी गीत स्पर्धेत एकूण १८ शाळांनी भाग घेतला. परिक्षक संगीत विशारद बळवंत जोशी व उर्दू लेखक व नाटककार राजा बागबान यांनी काम पाहिले. प्रास्तविकात सहसचिव व संयोजक मेहमूद नवाज यांनी केले.

यावेळी प्रथम पुरस्कार हरिभाई देवकरण प्रशाला (रोख ३ हजार, स्मृतीचिन्ह), द्वितीय जि. प. उर्दू प्रशाला होटगी (रोख रु. २हजार), तृतीय शमा उर्दू प्रायमरी स्कूल, नई जिंदगी (रोख रु. १ हजार), उत्तेजनार्थ- जि. प. उर्दू प्रशाला हत्तूर, सोलापूर सोशल असो. माध्य. शाळा, एम. ए. पानगल उर्दू हायस्कूल, नगरपालिका उर्दू प्रायमरी स्कूल नं. १६, पंढरपूर. याप्रसंगी मन्नान शेख, नासिर आळंदकर, रफीक खान, साबीना इंगळगी, अयुब नलामंदू, संचालक मजहर अल्लोळी, खलील शेख, इम्रान अलमेलकर, अलीमोद्दीन दंडोती उपस्थित होते.

## शेकोटीने भाजलेल्या वृद्ध महिलेचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर : शेकोटीतील आगीच्या भडक्याने भाजून जखमी झालेल्या नागरबाई मोहन डांगे (वय ७५ रा. मुकुंद नगर भवानी पेठ, सोलापूर) या शासकीय रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी सकाळी मयत झाल्या. नागरबाई डांगे या २० डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास घराजवळ शेकोटी पेटवून बसल्या होत्या. त्यावेळी साडीचा पदर पेटून त्या भाजल्या होत्या. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

**पूर्ववैमनस्यातून पाईपने मारहाण**

पूर्ववैमन्यस्यातून शिवीगाळ करत प्लॅस्टिकच्या पाईपने मारहाण केल्याची घटना काका गणपतीजवळ, भवानी पेठ, सोलापूर येथे घडली.

याप्रकरणी शकुंतला गोविंद हक्के यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून जितेंद्र महेंद्रकर व तीन अनोळखी इसम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच कलागुण आत्मसात करावे : जमादार

✔ सुराज्य/सोलापूर

आजच्या काळात विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच विविध कलागुण आत्मसात करणे आवश्यक आहे. शिक्षकांबरोबरच पालकांनीही विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडवावेत, जेणेकरून प्रत्येक विद्यार्थी भविष्यात यशस्वी माणूस बनेल, असे प्रतिपाद तालुका शिक्षण अधिकारी बापूसाहेब जमादार यांनी केले.

कुमठे शिक्षण मंडळ संचलित लिटल स्टार इंग्लिश



स्कूलच्या स्नेहसंमेलानात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी संस्थेचे प्रमुख विश्वस्त जयकुमार माने, माजी नगरसेविका प्रिया माने, विश्वस्त स्वाती माने, जिल्हा शिक्षक समितीचे चेअरमन म. ज. मोरे, प्रा. रोहिणी चव्हाण, प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश काशिद उपस्थित होते.

यावेळी इंग्लिश स्कूलच्या १ते८ वीच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक नृत्य, लावण्या, नाटिका सादर केल्या. यावेळी जयकुमार माने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी स्कूलच्या हेड रेणुका उमदी, माध्य.चे मुख्याध्यापक दिनेश बिराजदार, जयसिंग गायकवाड उपस्थित होते.

## दुचाकीच्या धडकेने पादचारी तरुण ठार

✔ सुराज्य/बार्शी : तालुक्यातील पानगाव येथे दुचाकीच्या धडकेने २६ वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडला. भैरवनाथ भारत भोंगे (वय २६ रा. पानगाव) असे मयताचे नाव आहे. या प्रकरणात बार्शी तालुक्याच्या पोलिसांनी राजकुमार मस्कु गायकवाड (रा. पानगाव) या दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

भैरवनाथ हा रात्री ११ वाजण्याच्या सुमारास गावातील चौकाजवळ रस्ता ओलांडत होता. त्यावेळी गायकवाड याच्या दुचाकीच्या धडकेने तो गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाला, अशा आशयाची फिर्याद मयताचे भाऊ सोमनाथ भोंगे यांनी पोलिसात दाखल केली. पुढील तपास फौजदार शिरसट करीत आहेत.

## माण नदी स्वच्छतेसाठी शासन, प्रशासन ग्रामस्थांची सांगड : घोंगडे

✔ सुराज्य/नाझरे : सुमारे २६०० वर्षांपासून मान नदी वाहत असून आपण झऱ्याचे पाणी स्वच्छ पिण्यास वापरत होतो. परंतु सध्या घाण नदीत टाकणे त्याचबरोबर गटारींचे व संडासचे पाणी नदीत सोडणे व यामुळे म्हणावा तसा ऑक्सिजन सर्वांना मिळत नाही. माण नदी स्वच्छतेसाठी शासन, प्रशासन व ग्रामस्थ यांची सांगड घालणे गरजेचे आहे, असे मत मानदी स्वच्छतेचे दूध वैजनाथ काका घोंगडे यांनी श्री दत्त मंदिर नाझरे, वझरे येथे व्यक्त केले. अध्यक्षस्थानी बांधकाम विभागाचे उपअभियंता बाळासाहेब नकाते हे होते.

प्रास्ताविक शिक्षक नेते उत्तम सरगर यांनी नाझरे व वजरे गावचे नदी स्वच्छतेसाठी सहकार्य करू असे सांगितले. तसेच मान नदीपात्रातील गळती बंधारा दुरुस्त करणे गरजेचे आहे, असे मत शिक्षक नेते दादासो वाघमोडे यांनी सांगितले तर नाझरे व वझरे ग्रामपंचायतीचे दुरुस्तीबाबत पत्र संबंधित विभागास देऊ असे सरपंच विजयकुमार देशमुख यांनी सांगितले.

यावेळी वझरे सरपंच प्राजक्ता सरगर, उपसरपंच सचिन यादव, शशिकांत पाटील महादेव पवार, महालिंग पाटील, प्रकाश सोळशे, शिवाजी सरगर, तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे पर्यवेक्षक खांडेकर वाघमारे देठे अभियंता खंडागळे, सदाशिव वाघमोडे तसेच वझरे नाझरे ग्रामसेवक, तलाठी, ग्रामस्थ उपस्थित होते. ९

## नव्या शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वात बदल होईल : कुलगुरू

सुराज्य/अक्कलकोट : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये आमूलाग्र बदल होईल, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले.

येथील सी. बी. खेडगी महाविदयालयात नॅक पुरस्कृत राष्ट्रीय परिषदेचे आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या परिषदेच्या उद्घाटनाप्रसंगी कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी होते.प्राचार्य डॉ. एस. सी. अडवितोट यांनी शैक्षणिक धोरणाच्या विविध बाजू मांडल्या. प्रास्ताविक भाषण इंग्रजी विभाग प्रमुख संध्या परांजपे यांनी केली. पाहुण्यांचा परिचय डॉ. आय. एम. खैरदी यांनी करून दिला. सूत्रसंचालन पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख जयश्री बिराजदार यांनी केले व आभार प्राणी शास्त्र विभाग प्रमुख डॉ. मधुरा गुरव यांनी मानले.

यावेळी डॉ. आरती देशपांडे, डॉ. योगेश दांडेकर, डॉ. नम्रता लोटिया यांनी मार्गदर्शन केले. परिषदेत १५० जणांनी सहभाग नोंदवला. ६२ जणांनी आपले संशोधन लेख प्रसिद्ध केले तर २२ जणांनी आपल्या संशोधन लेखांचे सादरीकरण केले. त्यातून रुपम महिपाल-गोस्वामी सनातन धर्म महाविद्यालय चंदीगड, रिची पाहुजा-गुरु गोविंद सिंग इंद्रप्रस्थ विद्यापीठ दिल्ली, पूर्णिमा कपूर-गोस्वामी गणेश दत्त सनातन धर्म महाविद्यालय चंदीगड, अमर विनोद चौहान-इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी पुणे, वैदेही वैद्य-सी. बी. खेडगी कॉलेज अक्कलकोट या संशोधकांना निवडण्यात आले. परिषदेच्या समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे मंद्रुपचे प्राचार्य डॉ. भिमाशंकर भांजे यांनी केले. परांजपे यांनी परिषदेचा थोडक्यात आढावा घेतला तर प्रा. डॉ. एस. सी. अडवितोट यांनी अध्यक्षीय भाषण केले. समारोपाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सुभाष धरणे होते.

## अतिक्रमण नियमाकुल करण्यासाठी एनडीएमजेचे तहसीलवर आंदोलन

✔ सुराज्य/अकलूज

**शासकीय जागेमध्ये अतिक्रमण नियमकुल करण्यासंदर्भात नॅशनल दलित मोमेंट फॉर जस्टीस संघटनेच्यावतीने विकास धाईंजे व वैभव गीतेच्या नेतृत्वात माळशिरस तहसील कार्यालयावर आंदोलन करण्यात आले.**

अतिरिक्त मुख्य सचिव ग्रामविकास व पंचायतराज महाराष्ट्र शासनाच्या २० ऑक्टोबरच्या २०१८ पत्रानुसार मंत्रिमंडळ बैठकीत दिलेल्या निर्दे शानुसार ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमाकूल करण्यास गती देऊन सदर निवासस्थानाची जागा अतिक्रमण धारकाच्या नावे करण्यात यावी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सोलापूर यांनी दि. १९ डिसेंबर २०२२ रोजी दिलेल्या पत्रानुसार अतिक्रमण नोंदणीमध्ये कार्यवाही करणे तसेच माळशिरस तालुक्यात शेती महामंडळाच्या जागेत अतिक्रमण करून राहिलेल्या लोकांचे अतिक्रमण निवासी नियमाकुल करून गावच्या हद्दीतील शेती महामंडळाच्या जागेवर राहणाऱ्या नागरिकांच्या घराची नोंद करून त्यांना नमुना नंबर आठचा उतारा देण्यात यावा. माळशिरस तालुक्यातील सर्व



नगरपंचायत शहरांतर्गत अतिक्रमण नियमाकूल करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल बैठकीत सादर करावा. तसेच अतिक्रमणा संदर्भात मा. तहसीलदार यांच्या अंतर्गत गटविकास अधिकारी तसेच संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांची तात्काळ बैठक लावण्यात यावी, अशी मागणी आंदोलना दरम्यान करण्यात आली. या संदर्भात नऊ मागण्या घेऊन आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनास नायब तहसीलदार तुषार देशमुख यांनी भेट दिली व सदर सर्व मागण्यांवर पुढील कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

या आंदोलनास विकास धाईंजे, वैभव गीते, प्रमोद शिंदे, सुनील भोसले, गणेश गायकवाड, गोरख गायकवाड, सुरज गायकवाड, आशिष धांडोरे, प्रज्ञेश कांबळे व बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलनास पंचायत समिती सदस्य अजय सकट व प्रहार संघटनेच्यावतीने पाठिंबा देण्यात आला.

# वकील उपलब्ध नसल्याने देशात ६३ लाख खटले प्रलंबित

## ▶ जिल्हा न्यायालयांना गौण मानण्याची मानसिकता बदलावी : सरन्यायाधीश

## ▶ शिक्षा भोगत असलेल्या कच्च्या कैद्यांची संख्या पाहता विरोधाभासी चित्र दिसते



✔ सुराज्य/अमरावती

**अमरावती (आंध्रप्रदेश) देशभरातील ६३ लाखांहून अधिक खटले वकील उपलब्ध नसल्याने प्रलंबित आहेत. १४ लाखांहून अधिक प्रकरणे कागदपत्रे किंवा नोंदी उपलब्ध होण्याच्या प्रतीक्षेत असल्याने प्रलंबित आहेत, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी शुक्रवारी येथे सांगितले.**

---------------------

आंध्रप्रदेश विधि अकादमीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा न्यायालये न्यायव्यवस्थेचा कणा असून, ही न्यायालये कनिष्ठ स्तरावर असल्याने त्यांना गौण मानण्याची मानसिकता नागरिकांनी बदलावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले की, 'जिल्हा न्यायालये हा न्यायव्यवस्थेचा केवळ कणा नसून, अनेकांसाठी न्यायव्यवस्थेतील महत्त्वाचा प्राथमिक टप्पा आहे. ते म्हणाले, की फौजदारी न्यायप्रणालीत कारागृहापेक्षा जामीन सर्वात मूलभूत नियमांपैकी एक आहे. भारतातील कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कच्च्या कैद्यांची संख्या पाहता विरोधाभासी चित्र दिसते, असे कैदी जामिनाच्या प्रतिक्षेत मोठ्या संख्येने मुक्ततेपासून वंचित आहेत. 'नॅशनल ज्युडिशियल डेटा ग्रिड'नुसार (एनजेडीसी) १४ लाखांहून अधिक खटले हे संबंधित नोंदी न मिळाल्याने किंवा संबंधित कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित आहेत. हे न्यायालयाच्या नियंत्रणाबाहेरचे काम आहे.

फौजदारी कायद्यांतील कलम ४३८ (जामीन) आणि कलम ४३९ (जामीन रद्द करणे) हे निरर्थक, यांत्रिक, निव्वळ प्रक्रियात्मक उपाय मानले जाऊ नयेत. जिल्हा न्यायालयात इन्कार मिळाला, की सरसकट उच्च न्यायालयात दाद मागितली जाते.

जिल्हा न्याययंत्रणेनेच यावर उपाय शोधून उपलब्ध करून दिले पाहिजेत. कारण देशातील वंचित-गरीब घटकांसाठी जिल्हा न्यायालयांना आधार मानले जाते. त्यांचा या घटकांवर मोठा प्रभाव असतो, असेही न्या. चंद्रचूड यांनी सांगितले.

'एनजेडीसी' च्या आकडेवारीनुसार, वकील उपलब्ध नसल्याने ६३ लाखांहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. अनेक न्यायालयांकडून अद्याप यासंदर्भातील आकडेवारी न मिळाल्याने हे प्रमाण खूप जास्त अथवा कमी असू शकेल. मात्र, आपली न्यायालये सक्षमतेने कार्यरत राहण्यासाठी आम्हांला वकील संघटनांचे समर्थन व सहकार्याची गरज आहे.

---

## पार्टीचे बिल मागितले, हात-पाय तोडण्याची धमकी

✔ सुराज्य/औरंगाबाद

शिंदे गटातील आमदार संजय शिरसाट यांच्या मुलाने केटरिंग व्यावसायिकाला हातपाय तोडण्याची धमकी दिल्याची ऑडिओ क्लिप व्हायरल झालीये. वाढदिवसाच्या पार्टीचे शिल्लक बिल मागण्यासाठी केटरिंग व्यावसायिकाने संजय शिरसाट यांच्या मुलाला फोन केला होता. मात्र तू माझ्या डोक्याला ताप देऊ नकोस, साहेबांनी दिले तेवढेच पैसे घे नाहीतर हात-पाय तोडेन, अशी धमकी सिद्धांत शिरसाट यांनी व्यावसायिकाला दिली.

घडलेल्या प्रकारावर आणि दिलेल्या धमकीवर आमदार संजय शिरसाट किंवा त्यांचे पुत्र सिद्धांत शिरसाट याप्रकरणात ते काय स्पष्टीकरण देतात, हे पाहणे महत्त्वाचे आहे. अद्याप तरी पोलिसांत याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला नाहीये.

## पोस्टातील ठेवींवर वाढीव व्याज

✔ सुराज्य/नवी दिल्ली

केंद्र सरकारने, येत्या १ जानेवारीपासून ठराविक अल्पबचत योजनांवरील व्याजदरात ०.२० ते १.१ टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे. अल्पबचत योजनांतील गुंतवणुकीवर देय व्याजदराच्या तिमाहीगणिक फेरनिर्धारण करताना ही सुधारणा करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिक ठेव योजनेसह, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (एनएससी) या पोस्टाच्या बचत योजनांना वाढीव व्याज मिळणार आहे. मात्र, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (पीपीएफ) आणि सुकन्या समृद्धी या योजनांवरील व्याजदरांत बदल करण्यात आलेले नाहीत.

वाणिज्य बँकांकडून मुदत ठेवींवरील व्याजदरात वाढ केली जात असताना, सरकारनेही अल्पबचत योजनांवरील व्याजदर वाढविणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार सुधारण करण्यात आलेले वाढीव व्याज दर हे नववर्षात १ जानेवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ कालावधीसाठी लागू असतील. त्यामुळे या पर्यायांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या छोट्या बचतदार आणि प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांना नववर्षारंभ सुखद दिलासा देणारा ठरेल. पाच वर्षे मुदतीच्या राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रावर (एनएससी) आता ७ टक्के दराने व्याज मिळेल. या आधी त्यावर ६.८ टक्के दराने व्याज मिळत होते. ज्येष्ठ नागरिक बचत योजनांवरील व्याजदर ०.४० टक्क्यांनी वाढवत तो ८ टक्क्यांवर नेण्यात आला आहे. तर पोस्टाच्या १ ते ५ वर्ष कालावधीच्या मुदत ठेव योजनांवरील व्याजदरात १.१ टक्क्यांपर्यंत वाढ केली गेली आहे. किसान विकास पत्रावरील व्याजदर ०.२ टक्क्याने वाढवीत ते ७.२ टक्के झाला आहे.

## अलमट्टी धरणावरून राज्य सरकार आक्रमक

✔ सुराज्य/कोल्हापूर

**अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याच्या कर्नाटक सरकारच्या निर्णयाने कोल्हापूर-सांगली भागांमध्ये महापुराचा धोका उद्भवणार असल्यानेच हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात उपस्थित करण्याचा इरादा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.**



कृष्णा नदीवरील विजापूर जिल्ह्यातील ११० टीएमसी पाणीसाठा क्षमता असलेल्या अलमट्टी धरणाचा मुद्दा गेली २० वर्षे सतत चर्चेला येत असतो. महाराष्ट्राच्या सीमेपासून २३५ किलोमीटर अंतरावर हे धरण आहे. या धरणाची उंची वाढवण्याचा इरादा कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी व्यक्त केल्यावर गतवर्षी राज्याचे तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी या निर्णयाचा अभ्यास करण्याची सूचना जलसंपदा विभागाला दिली आहे. निष्कर्ष निघाल्यानंतर आवश्यकतेनुसार कर्नाटक सरकारशी चर्चा करू, असे ट्वीट केले होते.

या धरणामुळे पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्याला अतोनात फटका बसत असल्याचा मतप्रवाह आहे. अलमट्टी धरण हे महापुराचे कारण होत नाही, असाही सूर आहे. एकंदरीत तज्ज्ञांमध्येही अलमट्टीच्या धरणावरून मतभेद दिसून येतात.

अलमट्टीचा फुगवटा (बॅकवॉटर) आणि कोयना धरणातील विसर्ग या दोन्हींची सांगड महापुराशी घातली जाते. २००५ सालच्या महापुरानंतर मेधा पाटकर यांच्या पथकाने केलेल्या सर्वेक्षणात अलमट्टी धरण महापुराला कारणीभूत असल्याचे म्हटले होते. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक लोकप्रतिनिधींनी ही भूमिका वारंवार मांडली आहे. काही अधिकाऱ्यांच्या मते अलमट्टी धरणामुळे पश्चिम महाराष्ट्रात पूरपरिस्थिती उद्भवते हा मुद्दा सिद्ध झालेला नाही.

## आनंदाची बातमी : कोकण रेल्वेतून थेट विदर्भ जोडण्याबरोबरच शेगावलाही जाता येणार

✔ सुराज्य/रत्नागिरी

**कोकणातील आता कोकणातून थेट विदर्भ जोडण्याचे स्वप्न पूर्ण होण्याबरोबरच आता शेगाव थांबा मंजूर झाला आहे. त्यामुळे आता श्री गजानन महाराज भक्तांना कोकणातून थेट श्री गजानन महाराजांच्या शेगावनिवासी थेट जाता येणार आहे. कोकण रेल्वे प्रशासनाकडून ही आनंदाची बातमी देण्यात आली.**

विदर्भ कोकण जोडणाऱ्या आणि कोकण रेल्वे मार्गे धावणाऱ्या नागपूर मडगाव द्वि साप्ताहिक विशेष गाडीतून प्रवास करणाऱ्या भक्तांवर शेगावचे गजानन महाराज दर्शनासाठी शेगावला जाणे सोपे झाले आहे. या एक्सप्रेस गाडीला ४ जानेवारी २०२३ पासून शेगाव



स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. कोकणातून शेगावला जाणाऱ्या भक्तांची मागणी या थांब्यामुळे पूर्ण झाली आहे.

०११३९/०११४० ही गाडी नागपूर ते गोव्यातील मडगाव दरम्यान आठवड्यातून दोन दिवस धावते. या गाडीला शेगाव स्थानकावर थांबा देण्यात यावा, अशी मागणी कोकण पट्ट्यातून शेगावच्या गजानन महाराजांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांकडून करण्यात येत होती.

अखेर या मागणीची दखल घेऊन रेल्वेने नागपूर -मडगाव विशेष एक्सप्रेसला दि. ४ जानेवारी २०२३ पासून थांबा मंजूर केला आहे.

## संशोधन केंद्रात अनियमितता

✔ सुराज्य/पुणे

शैक्षणिक वर्ष २०२१-२२मध्ये पीएचडीची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केलेले किंवा सवलत मिळालेले काही विद्यार्थी अजूनही पीएचडी प्रवेशाच्या प्रतिक्षेत आहेत.

काही संशोधन केंद्रांमध्ये वर्ष होऊनही या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक मिळाले नसल्याच्या तक्रारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या विद्यार्थ्यांना तातडीने प्रवेश द्यावा, असे आदेश विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. १५ जानेवारीपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सध्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३मधील पीएचडी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. मात्र,



गेल्या वर्षी काही विद्यार्थ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करून, उत्तीर्ण होऊनही अद्याप त्यांना प्रवेश मिळू शकलेले नाहीत. विद्यापीठ प्रशासनाने नुकतीच सर्व संशोधन केंद्रांची तपासणी केली असून, त्यात उपलब्ध मार्गदर्शक, प्रवेश संख्या याबाबतची माहिती संकलित केली आहे. असे असतानाही काही संशोधन केंद्रांमध्ये वर्षभरापासून विद्यार्थ्यांचे प्रवेश रखडले असल्याच्या तक्रारी विद्यापीठ प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने परिपत्रक काढले असून, गेल्या वर्षीचे रखडलेले प्रवेश तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संशोधन केंद्रांच्या तपासणीत त्यांनी सर्व प्रकारची माहिती देणे अपेक्षित आहे. मग गेल्या वर्षीचे प्रवेश रखडले असल्याची माहिती, या संशोधन केंद्रांनी का दिली नाही, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. विद्यापीठ प्रशासनानेही हा प्रश्न संशोधन केंद्रांसमोर उपस्थित केला असून, या केंद्रांमध्ये सारे काही अलबेल नाही, हेच यावरून स्पष्ट होत आहे.

## देशमुख, राऊत यांच्या सुटकेवरुन आता तरी धडा घ्या : पवार



✔ सुराज्य/मुंबई

आज २०२२ या वर्षाचा शेवटचा दिवस आहे. नव्यावर्षाच्या स्वागतासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे बारामती येथे आले असताना माध्यमांशी त्यांनी संवाद साधला. अनिल देशमुख यांच्या सुटकेवर बोलत असताना ते म्हणाले की, सत्तेचा गैरवापर होतोय, हे आम्ही सातत्याने सांगतोय. अनिल देशमुख, संजय राऊत यांच्याबाबत हे दिसून आले आहे. ज्या लोकांना आत टाकलं, त्यांच्याबद्दल काही आढळलं नाही, हे न्यायदेवतेने देखील सांगितले आहे. सत्तेचा गैरवापर करुन लोकप्रतिनिधींना डांबून ठेवण्याचे काम मागचे सहा महिने - वर्षभरात झाले. याच्यामधून सरकारचा दृष्टीकोन चुकीचा आहे, हे कोर्टाच्या माध्यमातून संबंध देशाच्या समोर आले आहे. सरकारने याच्यातून काहीतरी शिकावे, एवढीच अपेक्षा.

## अपघात दाव्यांसाठी विशेष पथक

### पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

✔ **सुराज्य/नवी दिल्ली** : मोटार अपघात प्रकरणांचा तपास करण्यासाठी आणि त्याबाबतचे दावे निकाली करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना तीन महिन्यांच्या आत पोलीस ठाण्यांमध्ये विशेष पथक स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

सार्वजनिक ठिकाणी मोटार वाहनामुळे अपघात झाल्याची माहिती मिळाल्यानंतर संबंधित विभाग 'मोटार वाहन दुरुस्ती' कायद्याच्या कलम १५९ नुसार पावले उचलेल. त्यानंतर पोलिसांनी तीन महिन्यांच्या आत दावा न्यायाधिकरणापुढे दाखल करावा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.




न्या. एस. ए. नझीर आणि जे. के. माहेश्वरी यांच्या पीठाने याबाबत निर्णय दिला. न्यायालय म्हणाले, राज्याच्या गृह विभागाचे प्रमुख आणि सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील पोलिस महासंचालक मोटार अपघात दावा प्रकरणांची चौकशी करण्यासाठी आणि त्याबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी पोलीस ठाण्यांमध्ये किंवा कमीतकमी शहर पातळीवर एक विशेष युनिट स्थापन करतील. तीन महिन्यांच्या कालावधीत ही कार्यवाही होणे आवश्यक आहे.'

## २८ वर्षांनी अखेर सूड उगवला

### ▶ तीन चिमुरड्यांसह आईचा खून करुन मुंबईतून पळाला, कतारमध्ये सेटलही झाला

✔ सुराज्य/मुंबई

**तब्बल २८ वर्षांपूर्वी मीरारोड परिसरात एका महिलेची आणि तिच्या तीन मुलांची हत्या करुन फरार झालेल्या एका मारेकऱ्याला जेरबंद करण्याची कामगिरी मुंबई पोलिसांनी करुन दाखवली आहे. राजकुमार चौहान असे या मारेकऱ्याचे नाव असून तो गेल्या कांही दिवसांपासून कतारमध्ये वास्तव्याला होता. पोलीस अनेक वर्षांपासून त्याचा शोध घेत होते. तो गुरुवारी मुंबईत आला तेव्हा विमानतळावर अलगदपणे सुरक्षायंत्रणांच्या तावडीत सापडला. राजकुमार चौहान आणि त्याचे साथीदार अनिल सरोज व सुनील सरोज यांनी २८ वर्षांपूर्वी जगरानी देवी (वय २७) आणि तिच्या तीन लहान मुलांची निर्घृणपणे हत्या केली होती. यानंतर हे तिघेही फरार झाले होते. तेंव्हापासून पोलीस या तिघांचा शोध घेत होते. अखेर गुरुवारी राजकुमार चौहान पोलिसांच्या तावडीत सापडल्याने आता इतर दोन मारेकऱ्यांच्या मार्ग काढणे शक्य होणार आहे.**



राजकुमार चौहान आणि सरोज बंधू हे १९९४ च्या सुमारास मीरारोडच्या कशमीरा परिसरातील पेणकरपाडा येथे वास्तव्याला होते. यावेळी त्यांच्या शेजारी जगरानी देवी प्रजापती यांचे कुटुंब वास्तव्याला होते. या तिघांनी जगरानी देवी यांचा लैंगिक छळ केला होता. यानंतर जगरानी देवी यांचे पती राजनारायण प्रजापती यांनी सर्व लोकांसमोर राजकुमार चौहान आणि सरोज बंधू यांच्या कृष्णकृत्याचा पर्दाफाश केला होता. यावेळी जगरानी देवी यांचा पती आणि या तिघांमध्ये मोठे भांडण झाले होते. हाच राग मनात ठेवून राजकुमार चौहान आणि सरोज बंधूंनी १६ नोव्हेंबर १९९४ रोजी जगरानी देवी आणि त्यांच्या तीन लहान मुलांचा निर्घृणपणे खून केला होता. या लहान मुलांचे वय अनुक्रमे पाच, दोन आणि तीन महिने इतके होते. या तिघांनी जगरानी देवी आणि त्यांच्या मुलांवर चाकूचे वार करून त्यांना ठार मारले होते. जगरानी देवी यांचे पती रात्री ११ वाजता घरी आल्यानंतर हा प्रकार उघड झाला होता. त्यानंतर राजनारायण प्रजापती यांनी पोलिसांत धाव घेतली होती. तेव्हापासून पोलीस या प्रकरणाचा तपास करत होते. परंतु, तिन्ही मारेकरी फरार असल्याने या प्रकरणाचा तपास फारसा पुढे सरकला नव्हता. दरम्यानच्या काळात २००६ साली एका अपघातामध्ये राजनारायण प्रजापती यांचे निधन झाले होते.

पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही केस गेल्यावर्षी रिओपन झाली होती. त्यावेळी कशमीरा पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. जगरानी देवी यांच्या मारेकऱ्यांचा मार्ग काढण्यासाठी मुंबई पोलिसांचे एक पथक त्यावेळी उत्तर प्रदेशात गेले होते. हे पथक तब्बल २० दिवस वाराणसीत ठाण मांडून बसले होते. तेव्हा पोलिसांना राजकुमार चौहान उर्फ काल्या उर्फ साहेब याच्याविषयी माहिती मिळाली होती. राजकुमार चौहान हा २०२०पासून कतारमध्ये कामाला असल्याचे पोलिसांनी समजले होते. या माहितीच्याआधारे पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली होती. पोलिसांनी राजकुमार चौहान याच्या पासपोर्टची तपासणी केल्यानंतर त्यांच्याविरोधात लूकआऊट नोटीस जारी केली होती.

राजकुमार चौहान याला या सगळ्याची पुसटशी कल्पना नव्हती. त्यामुळे गुरुवारी तो मुंबई विमानतळावर आला तेव्हा सुरक्षा यंत्रणांनी त्याला ताब्यात घेतले. राजकुमार चौहान याची रवानगी सध्या पोलीस कोठडीत करण्यात आली असून त्याच्याकडून इतर दोन मारेकऱ्यांचा ठावठिकाणा जाणून घेण्यासाठी पोलीस प्रयत्नशील आहेत.

## दोन जहाल माओवाद्यांना कंठस्नान

### गडचिरोलीच्या सी-६०ची छत्तीसगढ हद्दीत कारवाई


✔ सुराज्य/गडचिरोली

**गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या छत्तीसगड हद्दीतील टेकामेटाच्या जंगलात सी-सिक्स्टी कमांडो पथकाने केलेल्या कारवाईत दोन जहाल माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. एकाला जखमी अवस्थेत अटक करण्यात आली. माओवाद्यांच्या कोमराम-भीम-मंचेरियाल या तेलंगणमधील विभागीय समितीची सदस्य इंद्रवेल्ली आणि मंगी दलमची कमांडर अनितक्काचा ठार माओवाद्यांत समावेश आहे. अनितक्कावर आंध्रप्रदेशात पोटा कायद्यांतर्गतची पहिली कारवाई झाली होती.**



जिमल गट्टा उपविभागांतर्गत येणाऱ्या सीमाभागात माओवाद्यांच्या हालचाली असल्याची माहिती गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक संदीप पाटील, पोलीस अधीक्षक निलोत्पल यांना मिळाली. दोन दिवसांपूर्वी याविरुद्ध अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्राच्या सीमेपासून दहा किलोमीटरवर टेकामेटाच्या जंगलात माओवादी असल्याचे स्पष्ट होताच जवान निघाले. जवानांना पाहताच माओवाद्यांनी गोळीबार सुरू केला. जवानांनीही प्रत्युत्तर दिले. जवानांचा वाढता दबाव पाहून माओवादी जंगलाचा आसरा घेऊन पसार झाले.



Sunday Morning

सुराज्य सोलापूर ८

रविवार, दि.१ जानेवारी २०२३

# क्रिप्टोचे गारूड जगावर आरूढ



पूर्वी आपल्या देशामध्ये विनिमय (देवाणघेवाण) करण्यासाठी वस्तू वापरल्या जात होत्या. त्याला वस्तू विनिमय असे म्हटले जाते. म्हणजे एखाद्याकडे ज्वारी असेल आणि दुसऱ्याकडे गहू असतील. गहूवाल्यास ज्वारी हवी असेल तर त्याने स्वत:कडील गहू देवून ज्वारीवाल्याकडील ज्वारी घेणे. म्हणजेच वस्तूच्या बदल्यात वस्तू घेणे. ही झाली वस्तूविनिमय पध्दत. कालांतराने मानवाने जसजशी प्रगती केली; तसतशी विनिमयाची साधने बदलत गेली. सोन्या-चांदीच्या मुद्रा, कवडी वगैरे ही विनिमयाचीच साधने होती. नंतरच्या कालखंडामध्ये जगात पैसा हे विनिमयाचे साधन सर्वश्रुत बनले आहे. भारतामध्ये 'रूपया' हे अमेरिकेमध्ये 'डॉलर' अशी 'पैसा' या विनिमयाच्या साधनाला नावे आहेत. सध्याच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात आभासी (व्हर्च्युअल) चलन आले असून त्याद्वारे विनिमयाची प्रक्रिया सुरू झाले आहे. या आभासी चलनालाच 'क्रिप्टो करन्सी' असे नाव पडले आहे. आज याच क्रिप्टो करन्सीचे गारूड संपूर्ण जगावर आरूड झाले आहे. हळूहळू ही क्रिप्टो करन्सी विनिमयासाठी पैशाची जागा घेत आहे. किप्टोच्या वापर जगामध्ये प्रचंड मोठ्या वेगाने वाढत आहे. अर्थात जग क्रिप्टो करन्सीकडे वळत आहे.

## क्रिप्टो करन्सी म्हणजे काय?




आपण सध्या व्यवहारामध्ये खरेदी-विक्रीसाठी पैसा या विनिमयाच्या साधनाचा वापर करतो. म्हणजेच पैसे देवून वस्तू किंवा सेवा खरेदी करतो. आता याच पैशाच्या जागी क्रिप्टो करन्सी आली आहे. म्हणजेच पैशाच्या ऐवजी क्रिप्टो करन्सी देवून आपण वस्तू किंवा सेवा खरेदी करू शकतो. मात्र आपण जशा नोटा किंवा नाणी हाताळू शकतो; तशा पध्दतीने क्रिप्टो करन्सी हाताळता येत नाही. कारण क्रिप्टो करन्सी ही संपूर्णत: आभासी(व्हर्च्युअल) आहे. नोटांसारखी क्रिप्टो करन्सी छापली जात नाही. म्हणजेच ते डिजिटल चलन आहे. क्रिप्टो करन्सी वापरून केले जाणारे सर्व व्यवहार हे डिजिटलीच करावे लागतात. प्रत्यक्ष या हातातून त्या हातात ही क्रिप्टो करन्सी हस्तांतरीत करता येत नाही.

## नियंत्रण कोणाचे?



प्रत्येक देशाचे चलन वेगवेगळे आहे. त्या चलनावर त्या देशातील मुख्य बँकेचे नियंत्रण असते. भारतीतील रूपया या चलनावर भारतीय रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण आहे. क्रिप्टो करन्सीवर मात्र कोणाचेच नियंत्रण नाही. कारण क्रिप्टो करन्सी ही कोणाच्याच मालकीची नाही. किंबहुना क्रिप्टो करन्सी ही कोण्या एका देशाची करन्सी नाही. क्रिप्टोद्वारे होणारे व्यवहार कोणत्याही बँकेच्या नियंत्रणाखाली केले जात नाहीत. कॉंप्युटरच्या अल्गोरिदमवर चालणाऱ्या या क्रिप्टो करन्सीवर ब्लॉकचेनच्या आधारे नियंत्रण ठेवले जाते.

## कसे चालते ब्लॉकचेनचे काम?



क्रिप्टो करन्सी वापरून केलेला एक व्यवहार एकाचवेळी लाखो कॉंप्युटरमध्ये नोंदवला जातो. म्हणजेच त्या व्यवहाराचा डाटा (data) भरला जातो. अर्थात तो डाटा एका ब्लॉक(blocks) मध्ये साठवला जातो. प्रत्येक व्यवहाराला नवीन ब्लॉक तयार होतो. अशा असंख्य ब्लॉकची एक साखळी तयार होते. ही साखळी लाखो कॉंप्युटरमध्ये नोंदवली जाते. म्हणून या ब्लॉकच्या साखळीलाच ब्लॉकचेन असे म्हटले जाते. एका ब्लॉकमध्ये अनेक व्यवहारांची नोंद केली जाते. जो ब्लॉक पूर्णपणे भरला जातो म्हणजेच त्याची क्षमता ज्यावेळी संपते; त्यावेळी तो ब्लॉक अन्य ब्लॉकशी जोडला जातो. त्यामुळे जगाच्या पाठीवर ब्लॉकचेनमधील एखाद्या कॉंप्युटरमध्ये जर काही छेडछाड केली तर चेनसिस्टिममुळे ती त्या एकाच कॉंप्युटरवर बदलली जावू शकते. मात्र ब्लॉकचेनमधील अन्य कॉंप्युटरमध्ये ती बदलता येत नाही. शिवाय ही छेडछाड ल ग ` च लक्षात येते आणि हॅकिंग तात्काळ रोखता येत नाही. ही ब्लॉकचेन दर दहा मिनिटांनी अपडेट केली जाते. म्हणूनच ब्लॉकचेनमधील डाटा हा पूर्णत: सुरक्षित समजला जातो.

## क्रिप्टोसारख्या अन्य कॉईन



१. रेड कॉईन : विविध देशांमध्ये तारांकीत हॉटेलमध्ये टीप देण्यासाठी या कॉईनचा वापर केला जातो.

२. सिया कॉईन : ही क्रिप्टोची डउ चिन्हांकित कॉईन आहे.

३. एसवायएस कॉईन : बिटकॉईनचाच एक भाग असणाऱ्या कॉईनची किंमत वेगाने वाढत आहे. व्यवसाय करणे, मालमत्ता खरेदी-विक्री करणे आदीसाठी ही कॉईन वापरली जाते.

४. व्हॉईस कॉईन : खास नवोदित संगीतकारांसाठी तयार करण्यात आलेली ही कॉईन असून संगीतकार आपली नवीन रचना तयार करून या कॉईनद्वारे कमाई करू शकतात.

५. मोनेरो कॉईन : काळ्या बाजारातील तस्करीसाठी वापरली जाणारी ही कॉईन आहे. खास सुरक्षा स्थापित केलेली ही कॉईन रिंग सिग्निचर म्हणून ओळखली जाते. डार्क वेब आणि ब्लॉक मार्केटमध्ये या कॉईनचा वापर होतो.

## क्रिप्टो करन्सीचे फायदे

१. क्रिप्टो एक डिजिटल चलन असल्यामुळे यामध्ये फसवणूक होण्याची शक्यता कमी आहे.

२. आपला पैसा क्रिप्टोमध्ये गुंतवून त्याचा फायदा घेता येतो. कारण क्रिप्टोचा बाजार आणि किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. म्हणजेच गुंतवणुकीसाठी हे एक उत्तम व्यासपीठ आहे.

३.बहुतेक क्रिप्टो करन्सी वॉलेट उपलब्ध आहेत, त्यामुळे ऑनलाइन शॉपिंग, पैशांचे व्यवहार सोपे झाले आहेत.

४. कोणतेही प्राधिकरण क्रिप्टो चलनावर नियंत्रण ठेवत नाही, ज्यामुळे नोटाबंदी आणि चलन अवमूल्यन यांसारखा कोणताही धोका नाही.

५. असे अनेक देश आहेत जिथे भांडवल नियंत्रण नाही. म्हणजे देशाबाहेर किती पैसा पाठवता येईल आणि किती मागवता येईल हे निश्चित नाही. त्यामुळे क्रिप्टो करन्सी सहज खरेदी करून देशाबाहेर पाठवता येते आणि नंतर त्याचे पैशात रूपांतर करता येते.

६. क्रिप्टो चलनाचा सर्वात मोठा फायदा अशा लोकांसाठी आहे ज्यांना त्यांचे पैसे लपवायचे आहेत. म्हणूनच क्रिप्टो चलन हे पैसे लपवण्यासाठी सर्वोत्तम व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे.

७. क्रिप्टो चलन पूर्णपणे सुरक्षित आहे. त्यासाठी तुमच्याकडे फक्त प्रमाणीकरण असणे आवश्यक आहे, कारण असे चलन ब्लॉकचेनवर आधारित आहे. त्यामुळे, कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यासाठी संपूर्ण ब्लॉकचेनचे खनन करावे लागेल.

## क्रिप्टो करन्सीचे तोटे


१. क्रिप्टोकरन्सीचा सर्वात मोठा तोटा म्हणजे त्याचे कोणतेही भौतिक अस्तित्व नाही, कारण ते छापले जाऊ शकत नाही. म्हणजे या चलनाच्या नोटा छापल्या जाऊ शकत नाहीत किंवा कोणतेही बँक खाते किंवा पासबुक जारी करता येत नाही.

२. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणताही देश, सरकार किंवा संस्था नाही, ज्यामुळे कधी कधी त्याच्या किमतीत मोठी उडी होते तर कधी खूप घसरण होते, त्यामुळे क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करणे धोकादायक ठरते.

३. हे शस्त्रास्त्र व्यापार, अंमली पदार्थांचा पुरवठा, काळाबाजार इत्यादी चुकीच्या कारणांसाठी सहजपणे वापरला जाऊ शकतो, कारण तो फक्त दोन लोकांमध्ये वापरला जातो. त्यामुळे, ते खूप धोकादायक देखील असू शकते.

४. ते हॅक होण्याचा धोकाही असतो. ही वस्तुस्थिती आहे की ब्लॉकचेन हॅक करणे तितके सोपे नाही कारण त्यात संपूर्ण सुरक्षा व्यवस्था आहे. असे असतानाही या चलनाचा कोणीही मालक नसल्याने हॅकिंगची शक्यता नाकारता येत नाही.

५., याचा आणखी एक तोटा म्हणजे जर तुमच्याकडून एखादा व्यवहार चुकून झाला असेल, तर तुम्ही तो परत घेऊ करू शकत नाही, त्यामुळे तुमचे नुकसान होते.



स्टुअर्ट हॅबर आणि डब्ल्यू स्कॉट स्टॉरनेट यांनी जगात सर्वप्रथम १९९१ मध्ये जगासमोर आणले. त्यानंतर २००९ मध्ये ही प्रणाली क्रिप्टो करन्सीला जोडण्यात आली.



## भारतात क्रिप्टोकरन्सीला परवानगी आहे का?

व्हर्च्युअल करन्सीच्या माध्यमातून क्रिप्टोकरन्सीमध्ये व्यवहार करायला सुप्रीम कोर्टाने मार्च २०२०मध्ये परवानगी दिलीय. एप्रिल २०१८मध्ये रिझर्व्ह बँकेने क्रिप्टोकरन्सीच्या ट्रेडिंगवर सरसकट बंदी घातली होती. म्हणजे बँका किंवा कोणत्याही वित्त संस्थांना व्हर्च्युअल करन्सीशी निगडीत कोणतीही सेवा देता येणार नव्हती. इंटरनेट अँड मोबाईल असोसिएशन ऑफ इंडियाने याला सुप्रीम कोर्टात आव्हान दिलं होतं.इतर अनेक देशांनी क्रिप्टोकरन्सीच्या ट्रेडिंगला परवानगी दिलेली आहे आणि इतकंच नाही तर स्वत:ची क्रिप्टोकरन्सीदेखील लॉंच केलेली आहे असं इंटरनेट अँड मोबाईल असोसिएशनचं म्हणणं होतं. यावर निर्णय देत सुप्रीम कोर्टाने क्रिप्टोकरन्सीमधल्या व्यवहारांचा मार्ग खुला केला.



## ब्लॉकचेन आणि क्रिप्टोकरन्सी




क्रिप्टो करन्सीच्या व्यवहारांसाइी ब्लॉकचेन हा पाया आहे. कारण क्रिप्टोचा प्रत्येक व्यवहार हा ब्लॉकचेनमध्ये नोंदवला जातो. नोंदवलेला प्रत्येक व्यवहार ब्लॉकचेनमध्ये सुरक्षित असतो. परिणामी या व्यवहारांवर ब्लॉकचेनशिवाय अन्य कोणाचेही नियंत्रण प्रस्थापित होत नाही.

## ब्लॉकचेनचा अन्य ठिकाणी वापर




क्रिप्टोकरन्सी आणि ब्लॉकचेन यांचा जसा परस्पर संबंध आहे. तसाच संबंध अन्य काही ठिकाणीसुध्दा दिसून येतो. ब्लॉकचेनचा वापर तारांकीत रूग्णालये, बँकिंग, रेल्वे आरक्षण आदी ठिकाणी केला जातो. एम्ससारखी रूग्णालये ब्लॉकचेनवरच चालतात. याशिवाय रेल्वे तिकीट आरक्षण प्रणालीसुध्दा ब्लॉकचेनवरच चालते. विविध बँकांचे व्यवहारसुध्दा ब्लॉकचेन प्रणालीमध्येच नोंदवून सुरक्षित ठेवले जातात.




## वजीर एक्स (Wazir X)

क्रिप्टो करन्सीच्या ट्रेडिंगसाठी वजीर एक्स हे फ्लॅटफॉर्म म्हणून काम करते. म्हणजेच क्रिप्टोमध्ये गुंतवूणक करण्यासाठी वजीर एक्स सारख्या प्रणालीचा वापर करावा लागतो. गुंतवणूक करताना आपल्याकडील पैसा वजीर एक्सला देवून त्याठिकाणाहून बिटकॉईन किंवा अन्य कॉईन खरेदी केल्या जातात. त्याद्वारे गुंतवूणक करून फायदा झाला तर वजीर एक्सच्या माध्यमातून बिटकॉईन विकून आपला पैसा काढून घेता येतो.